स. ग्रं. सं. ठाणे
विषय काव्य
क्र. नं. ९५१
२५८९६३०

केशवकुमार



REFBK-0004248
REFBK-0004248

दावूं गाउनि आमुच्याच कविता आम्हींच रस्त्यामधें,

झेंडू पुस्तक-फार्मसी—पहिलें पुस्तक

८२४९
८-२-३१

'केशवकुमार' कृत

# झेंडूचीं फुलें

संग्राहक

दिनकर गंगाधर केळकर

८२४८

[ सुधारून वाढविलेली द्वितीयावृत्ति ]

REFBK-0004248
REFBK-0004248

दसरा १९३०

किंमत १० आणे

प्रकाशक
अनंत सखाराम गोखले,
'रत्नाकर' कचेरी, ५५२ नारायण, पुणें नं. २.

[ सर्व प्रकारचे हक्क लेखकाकडे ]

मुद्रक
अनंत सखाराम गोखले,
'विजय' प्रेस, ५७० शनवार, पुणें नं. २.

# समर्पण

बोलूनचालून 'झेंडूचींच फुलें'! यांना वास तरी कसला आणि
रंग तरी कसला? मोहक फुलांच्या सुवासासाठीं हपापलेली
रसिकता या बिनवासाच्या आणि भडक रंगाच्या दरिद्री
आहेराचा कसा स्वीकार करणार? उलट तिच्या
भावनेची कोमलता दुखवल्याचा उद्धटपणा केल्या-
चें पाप मात्र पदरीं यावयाचें! तरी पण
वाङ्मयाच्या वरातींत कोतवाली घोड्याप्रमाणें
पुढें पुढें नाचणाऱ्या घोडकवींच्या गळ्यांत
सणासुदीचे दिवशीं माळा करून घाला-
वयाला जरी हीं 'झेंडूचीं फुलें' उप-
योगी पडलीं तरी संग्राहकाला
आपल्या श्रमाचें सार्थक
झाल्यासारखें वाटेल!

—संग्राहक.

# झेंडू पुस्तक-फार्मसी

[ 'निरंकुशः कवयः' या कुठल्या तरी इसवी सनाच्या कायद्यान्वयें रजिस्टर झालेली.]

अनधिकृत भांडवल—मराठी नियतकालिकांतून, मासिकांतून, पुरवण्यांतून, काव्यसंग्रहांतून आजपर्यंत प्रसिद्ध झालेल्या व पुढें होणाऱ्या कविता

**Born in 1922 :** Still going strong !

—*Johnni Walker.*

ॐ ॐ ॐ

वाहवा, वाहवा झेंडू हा । सुंदर कितितरि खचीत हा !

—मिस् मेरी, मु० भोर.

ॐ ॐ ॐ

मेल्यावर आमुचे सगळे । उभारतिल दगडी पुतळे
भंवतालीं धरितिल फेर । आज परी करिती जेर !—आम्ही कोण ?

ॐ ॐ ॐ

" दे ग माळणी, झेंडूचें फूल !" —चि. सखू वाघमारे.

ॐ ॐ ॐ

" आहेतच मग फुलें झेंडुचीं !" —सुधारक-महाकाव्य.

इ० इ० इ०

अध्यक्ष—मौलाना अल्लाउद्दिन खिलजी.

चिटणीस—सवाई जननीजनकज.

पत्ता—नव्या पुलावरील कठडा.

'झेंडूच्या फुलां'च्या पहिल्या आवृत्तींतील कांहीं कवितांत फेरबदल करून व तींत अधिक नवीन कवितांची भर घालून सदर 'सुधारून वाढविलेली द्वितीयावृत्ति' आतां प्रसिद्ध होत आहे. या आवृत्तींत फक्त माझ्या स्वतःच्याच कवितांचा अंतर्भाव केला असल्यानें मूळ आवृत्तींतील माझ्या एका मित्रांची कविता नाइलाजानें घेतां आली नाहीं. माझ्या इच्छेस मान देऊन प्रो० लक्ष्मणशास्त्री लेले यांनीं या पुस्तकास प्रस्तावना लिहिली याबद्दल मी त्यांचा फार आभारी आहे.

—केशवकुमार.

# अनुक्रमणिका


| नांव | पृष्ठ |
|---|---|
| १. कवि आणि चोर ( खण्डकाव्य). | १ |
| २. कादरखां. | ९ |
| ३. सांग कसे बसले ? | ११ |
| ४. फूल, कवि, बाला आणि मासिक. | १२ |
| ५. पाहुणे. | १३ |
| ६. आम्ही कोण ? | १६ |
| ७. मोहरममधली मर्दुमकी. | १७ |
| ८. सखे, बोल–बोल. | २० |
| ९. रस्त्यावर पडलेलें विडीचें थोटुक. | २३ |
| १०. कषाय-पेय-पात्र-पतित मक्षिकेप्रत. | २५ |
| ११. पाय घसरला तर ?— | २९ |
| १२. श्यामले— | ३४ |
| १३. नवरसमंजरी ( ९ कविता ). | ३७ |
| १४. कवि आणि कारकून. | ५१ |
| १५. चांफा. | ५२ |
| १६. अरुण. | ५४ |
| १७. सारंगीवाला. | ५९ |
| १८. कवीचीं विरामचिन्हें. | ६१ |
| १९. प्रेमाचा गुलकंद. | ६३ |
| २०. कानगुजला. | ६५ |
| २१. पत्रें लिहिलीं पण— | ६६ |
| २२. —स | ६७ |
| २३. मनाचे श्लोक. | ६८ |
| २४. कवि आणि कवडा. | ७१ |
| २५. रसिकांस चेतवणी. | ७२ |

# चार प्रास्ताविक शब्द

हें जग गुणदोषांचें मिश्रण आहे. यांतील दोषांचें प्रमाण कमी करून गुणांचा उत्कर्ष करण्याविषयीं सज्जनांचा सदैव प्रयत्न चालू असतो. धर्मक्षेत्रांत अराजक उत्पन्न झाल्यास धर्मसंस्थापनेकरितां प्रत्यक्ष परमेश्वर अवतरतो. राजकीय व सामाजिक प्रदेशांत कोणीं पुंडाई माजविल्यास क्षत्रिय वीर व खंदे समाजसुधारक पुढें सरसावतात व इष्ट फेरफार घडवून आणतात. वाङ्मयाच्या राज्यांत बंडाळी उत्पन्न झाल्यास तिचा समाचार घेणारे पराक्रमी टीकाकार उत्पन्न होतात व ते शारदेच्या उज्ज्वल सिंहासनाचें पावित्र्य व वैभव यांचें मर्दुमकीनें रक्षण करितात.

अपराध आणि शिक्षा ही जोडी मानवांच्या उत्पत्तीइतकीच प्राचीन आहे. हिला होणारें शोभन अपत्य म्हणजे सद्भाव, सदाचार किंवा सुविचार हें होय. वाङ्मयक्षेत्रांत टीकाकार हे न्यायाधीश व दोषदर्शन ही शिक्षा असते. अर्थात् ही शिक्षा अपराध्याच्या मनाला व बुद्धीला असते. दोषदर्शनाचें काम इष्ट व आवश्यक असतें आणि तें सर्व कालीं थोडयाबहुत प्रमाणांवर व एखाद्या विशिष्ट रीतीनें चालू असतेंच. 'निंदकाचें घर असावें शेजारीं' या एका शूद्र महाकवीच्या लघुवचनांत केवढा विशाल अर्थ भरलेला आहे! यांतील 'निंदक' या शब्दाला निंदाव्यंजक अर्थ नसून त्याचा 'दोषदर्शनकार' असा चांगला अर्थ आहे. तसेंच वरील उक्तींत 'असावें' हें महत्त्वाचें पद आहे. त्यानें दोषदर्शनाची आवश्यकता व सुफलप्रदता सुचविली आहे.

वाङ्मयांतील अपराध म्हणजे अनौचित्य होय. वर्ण, शब्द, रचना, शैली, विचार, कल्पना, भावना इत्यादिकांना कमीपणा आणणाऱ्या जेवढ्या गोष्टी त्या साऱ्या 'अनौचित्य' या एका नांवाखालीं येतात. मम्मट, क्षेमेंद्र, जगन्नाथ, राघवभट्ट, मल्लिनाथ वगैरे विदग्ध संस्कृत आलंकारिकांनीं औचित्यचर्चा थोडीफार केली आहे. इंग्रजी भाषेंत टीकेचें एक स्वतंत्र, प्रगल्भ व विस्तृत शास्त्रच तयार झालेलें आहे. त्यांत यथेच्छ व यथासंभव अवगाहन करून आपल्या महाराष्ट्रांत चिपळूणकरद्वय, गुंजीकर, वामन दाजी ओक, हरिपंत पंडित, महा-

जनी, टिळक, आगरकर, वैद्य, परांजपे, कोल्हटकर, केळकरप्रभृति वाङ्मयटीकाकार तयार झाले. त्यांचे टीकालेख महाराष्ट्रसाहित्यास उपकारक आहेत.

प्रकृति-भेदानें टीकाकारांचे दोन मुख्य भेद होतात; एक मवाळ टीकाकारांचा प्रकार व दुसरा जहालांचा. वरील यादींत दोन्ही प्रकारचे टीकाकार असून कांहीं सव्यसाचीही आहेत. विषदिग्ध वाग्बाणांनीं शत्रूस नेस्तनाबूद करण्याला पराक्रम लागतोच, तथापि प्रतिपक्ष्याला ताळ्यावर आणण्याला मृदु अस्त्र पुष्कळ वेळां अधिक समर्थ असतें. परंतु हें अस्त्र योजणाऱ्या वीराच्या अंगीं सहिष्णुता, अनुकंपा, दोषशुद्धीची खरी इच्छा व समंजस बुद्धि या बहुमोल व दुर्मिळ गोष्टी लागतात. असा सहृदय विद्वान् टीकाकार मिळणें ग्रंथकाराचें व वाचकांचेंही भाग्य होय. तथापि टीकाकारांकडून आपल्या ग्रंथाची अजीबात उपेक्षा होणें ही गोष्ट लेखकाला अत्यंत अपमानाची व निराशाजनक वाटते. यापेक्षां तो टीकाकाराचे कठोर प्रहार सहन करण्याला तयार होतो. कारण टीकेच्या वादळांत निदान आपलें आणि आपल्या ग्रंथाचें नांव तरी गिरक्या खात असल्याचा मान त्याच्या पदरांत पडतो !

मृदु टीकास्त्र मोठें प्रभावशाली असतें. प्राणघातक तोफा, विषारी बाण, तीव्र भाले, काळजाला घरें पाडणारे शब्द व मनोभंग करणारीं वचनें यांना न साधणारीं कामें कित्येक प्रसंगीं मृदुल टीकेनें केलेलीं आहेत. विनोदगर्भ उपहास हा मृदु टीकेचा प्राण किंवा आत्मा आहे. उपहासाला संस्कृतांत विडंबन हें मोठें सुंदर नांव आहे. याला मराठींत स्थूलमानानें थट्टा, फजिती, टर, रेवडी अशांसारखीं नांवें देतां येतील. वक्रोक्ति, अतिशयोक्ति, व्याज-स्तुति, अन्योक्ति, असंगति, छेकापह्नुति, दृष्टान्त, विरोध, विषम इत्यादि अलंकारांचा अवलंब करून विडंबनाचा उत्तम परिपोष करतां येतो. असंगति हा धर्म हास्यरसाचें बीज असल्यानें व उपहासाचें फलही हास्यरस असल्यानें हास्यरसाची सर्व सामग्री उपहासाच्या उपयोगी पडते. विडंबित व्यक्तीला आपला उपहास वाचून गुदगुल्या व्हाव्या व आपले दोष पटून ते सुधारण्याची इच्छा व्हावी, तसेंच टीका वाचणारालाही टीकाविषयक व्यक्तीविषयीं तिरस्कार न वाटतां अनुकंपा किंवा कींव उत्पन्न व्हावी, म्हणजे त्या विडंबनाचा किंवा उपहासाचा परम उत्कर्ष झाला असें खाचित समजावें. अंगाला शस्त्र न लावतां त्यांतील दूषित रक्त मात्र बाहेर काढणें हें जितकें कठिण, तितकेंच, टीकाविषयीभूत कवीला व

टीकावाचकांस बिलकुल न दुखवितां, एवढेंच नव्हे तर उलट हंसवून सोडून, मृदु टीकेनें काव्यसंशोधन करणें, कठिण आहे.

'झेंडूचीं फुलें' या विनोदी काव्याच्या सुधारून वाढविलेल्या दुसऱ्या आवृत्तीची एक प्रत आमच्याकडे प्रस्तावनेकरितां आली असल्यामुळें टीकाविषयक सामान्य उपन्यास वरतीं थोडक्यांत करावासा वाटला. पुण्य-पुरुषांच्या प्रमाणें सत्काव्यालाही पुनर्जन्माची भीति नसते. असत्काव्याचें विडंबन करण्याचें महापातक केल्यामुळेंच कीं काय 'झेंडूच्या फुलांस' पुनर्जन्माची शिक्षा झाली! परंतु वाचकवर्गाच्या कृपादृष्टीचें हें फल असावें असें अनुमान केल्यास तें चुकीचें होईल असें वाटत नाहीं. व्याकरणानें झेंडूच्या फुलांना समानलिंगी बनविलें असलें तरी त्या फुलांनीं बराच पुरुषार्थ गाजविल्याचा प्रत्यय येत आहे! कविताकामिनी एवढ्याचकरितां वैयाकरणावर रुष्ट होऊन फुलांचें परोपरीनें कौतुक करणाऱ्या अलंकारविशारद कविवरांवर प्रेमोत्फुल्ल कटाक्षांची वृष्टि करीत असते. 'झेंडूचीं फुलें' पुन्हां जन्माला आलीं यामुळें त्यांच्या जनकास पुत्रजन्ममहोत्सवाचा द्विगुणित आनंद होत असला पाहिजे. रा० प्रल्हाद केशव अत्रे ऊर्फ केशवकुमार हे केवळ प्रस्तुतच्या पुस्तकाचेच जनक नसून त्यांचीं इतर गद्य पद्यात्मक लहान-मोठीं अपत्यें महाराष्ट्रांत इतस्ततः बागडत आहेत. त्यांच्या बालोचित मनोहर लीलांवरून रा० अत्रे यांचें कवित्व व विनोदशीलत्व महाराष्ट्रीय काव्यवाचकांच्या चांगलें परिचयाचें झालें आहे. 'मनोरमे'ला मनोरम करण्याचा त्यांचा उद्यम कोणास ठाऊक नाहीं! रा० अत्रे सुसंस्कृत पदवीधर असून विलायतेहून शिक्षणशास्त्री होऊन आल्यापासून ते शाणोल्लीढ मण्याप्रमाणें पुण्याच्या शैक्षणिक वातावरणांत चमकूं लागले आहेत. विनोद हा गुण त्यांच्यामध्यें स्वभावसिद्ध आहे. विडंबना करावयाला लागणारें सगळें साहित्य त्यांस अनुकूल आहे. या गुणांचा उपयोग करण्याची त्यांना हौस आहे. या हौसेची व रसिक उद्यमाची गांठ पडली. या अनुरूप दंपतीला गोंडस व बाळसेदार अपत्य झालें. तींच हीं 'झेंडूचीं फुलें!'

परिमलाच्या बाबतींत हीं फुलें मालती, मोगरा, जाई, जुई, चंपक, बकुल, निशिगंध, पारिजात इत्यादि अभिजात पुष्पांशेजारीं बसूं शकत नाहींत; तथापि तीं वर्णसौष्ठव व रचनासौंदर्य या गुणांत कोणाला हार जातील असें वाटत नाहीं. शिवाय विजयादशमीच्या दिवशीं विजयी वाजिराजींच्या कंठांत, पोळ्याच्या

अमावास्येला नंदिकेश्वराच्या शृंगांवर व मानेवर, नवरात्रांत दुर्गादेवीच्या उत्तमांगावर लोंबणाऱ्या हारांत व विजयोत्सवप्रसंगीं उभारल्या जाणाऱ्या उत्तुंग तोरणांवर प्रतिष्ठेनें मिरविण्याचा मान यांनाच मिळतो. प्रस्तुत पुस्तकाला 'झेंडूचीं फुलें' हें नांव देण्यांत कवीची शालीनता व्यक्त होत आहे. रत्नावलि, मणिमाला, मौक्तिकमाला अशांसारखें एखादें भपकेदार नांव रा० अत्रे यांच्या अक्षय व अखंड शब्दटंकणशाळेंतून बाहेर पडणें मुळींच कठिण नव्हतें. झेंडूच्या फुलांची कशीही संभावना झाली तरी हरकत नाहीं; तथापि बुडाशीं खोबरें आहे तें तरी वाचकांच्या पदरांत पडावें अशी त्यांची इच्छा प्रस्तुत पुस्तकाच्या शेवटच्या 'रसिकांस चेतवणी' या पद्यांत व्यक्त झाली आहे. यावरून हीं 'झेंडूचीं फुलें' तयार करण्यांत त्यांचा काय उद्देश होता तें स्पष्ट होत आहे.

प्रस्तुत पुस्तकाच्या अंतरंगांत प्रवेश करण्यापूर्वी तें तयार करतेवेळीं रा० अत्रे यांच्या दृष्टीपुढें कोणती सृष्टि होती याचा विचार करणें अप्रस्तुत होणार नाहीं; येवढेंच नव्हे, तर तो मनोरंजक व उद्‌बोधकही होईल असा भरंवसा वाटतो. गेल्या दहा–पंधरा वर्षांत महाराष्ट्रांत व विशेषतः पुण्यांत मराठी वाङ्मयात्मक, व त्यांतूनही केवळ मराठी काव्यक्षेत्रांत, झालेल्या कित्येक घडामोडींकडे व परिवर्तनांकडे रा० अत्रे यांचें लक्ष वेधलेलें दिसतें. आत्मप्रतिष्ठेकरतां हापापलेल्या कांहीं लेखकांनीं सरस्वतीच्या नांवावर डोलारे उभारण्याचा खटाटोप कसा केला व त्यांचे अनभिषिक्त अध्यक्ष बनण्याकरितां कशीं रणें माजविलीं याची वार्ता रा० अत्रे यांस लागली असावी. हीं सरस्वतीभवनें कांहीं दिवस कित्येक लब्धप्रतिष्ठ व रिकामटेकड्या साहित्यकिंकरांनीं खाण्या-खिदळण्याचे अड्डे बनविलीं होतीं ही गोष्ट रा० अत्रे यांस महशूर झाली असेल. कधीं कधीं कांहीं साहित्यभक्तांच्या 'अहोरूपमहो ध्वनिः'च्या ध्वनीनें, तर कधीं कधीं त्यांच्यामधील परस्पर स्पर्धेनें उडालेल्या खटक्यांच्या प्रतिध्वनीनें, सदर सरस्वतीमहाल निनादित झाले होते. हा वृत्तान्त रा० अत्रे यांच्या श्रवणपथावर जाऊन थडकला असेल. तनुनिर्वाहाच्या उदात्त हेतूनें प्रेरित होऊन कित्येक शारदा-भक्तांनीं उष्ट्या पत्रावळींचीं चोपडीं तयार करून आपल्या परमपूज्य आराध्यदेवतेला त्यांचा भक्तिरसमिश्र रुचिकर नैवेद्य समर्पण करण्याचे गंभीर समारंभ अवडंबरपूर्वक साजरे केले हेंही रा० अत्रे यांस कळल्यावांचून राहिलें नसेल. सदुद्यमाच्या अभावीं कित्येक दिवस मयन्त्या व जयन्त्या हुडकून काढून किंवा निर्माण करून

प्रचंड घोषणेमध्यें मंदिरांचें अस्तित्व पुकारण्याचा कित्येक भक्तांनीं भगीरथ यत्न केला हें वर्तमान रा० अत्रे यांस श्रुत झालें असेल. काव्यकारांचीं मंडलावर मंडलें जन्मास येऊन त्यांत चुरशीचे सामने सुरू झाले आणि काव्यवीरांच्या शस्त्रांच्या खणखणाटांतून आतां ठिणग्या बाहेर पडून धारातीर्थांत ते सुस्नात होतात कीं काय, अशा शंकेनें सूर्यमंडल, बुधमंडल व रंभाकुचमंडलही अकांड कंपित होण्याचा प्रसंग येऊन ठेपला ! अंतरिक्षांतील वायुमार्गांत आणि आकाशगंगेच्या स्रोताबरोबर, पसरलेली ही किंवदन्ती पुण्यांतल्या पुण्यांत रा० अत्रे यांस कळली नसेल हें संभवत नाहीं एकदां तीन चार लेखकांनीं एक अल्पभांडवली, बिनअक्कली, शून्यश्रमाचें व बहुमूल्योत्पादक एक पुस्तक समाईक नफ्याच्या लोभानें काढण्याचा कारखाना सुरू केला. त्यांत पुढें छापखान्याच्या बिलाची भानगड उपस्थित झाल्यामुळें छापलेल्या पुस्तकाची हिसकाहिसक सुरू झाली व छापखानेवाला आणि पुस्तकाचे पातीदार यांमध्यें जोराचा तंटा उपस्थित झाला. हें प्रकरण बरेंच दिवस पुण्यापासून नागपुरापर्यंत कधीं पंजाबमेलच्या गतीनें तर कधीं बैलगाडीच्या वेगानें प्रवास करीत होतें. ही गोष्ट रा० अत्रे यांस अज्ञात नसावी. एक कवि आपल्या उपकारकर्त्यावर उलटून कृतघ्नपणानें काव्यमिषानें त्याची बदनामी करतो व न्याय-कोर्टांत अपराधी ठरून दंडाला पात्र होतो; तर दुसरा कोणी एक मुंबईंत एका बँकेवर डल्ला मारून नांव बदलून दूरच्या एका गांवीं ग्रंथकर्तृत्वाच्या आसनावर अधिष्ठित होऊं लागतो तोंच त्यास चतुर्भुज होण्याचा प्रसंग येतो व तो गुन्हेगार ठरून बिनभाड्याच्या घरांत कांहीं महिने एकांतवासांत कंठितो ! या वर्तमानपत्रांत प्रसिद्ध झालेल्या वाङ्मयसेवकांच्या कथा रा० अत्रे यांच्या कोमल मनाला पीडा देत असल्या पाहिजेत. चार थोर लोकांचा आधार असल्याशिवाय आपण उभारलेल्या सारस्वत-मंदिराला स्थैर्य येणार नाहीं असा अनुभवानें उत्पन्न होणारा शहाणपणाचा विचार कांहीं वाङ्मयसेवकांच्या मनांत येऊन त्यांनीं अलीकडे कांहीं प्रसिद्ध विद्वान् वाङ्मयभक्तांची कास धरून आपल्या संस्था तगविण्याचे केलेले प्रयत्नही रा० अत्रे यांस श्रुत असतील. अशा प्रकारें कित्येक कवि व लेखक यांचीं विचित्र चरित्रें आणि लीला रा० अत्रे यांच्या अंतश्चक्षूंपुढून चलचित्रपटाप्रमाणें गेल्या असाव्या, असा तर्क होतो. काव्यरचनाविषयक विविध अनौचित्य-प्रसंगांनीं त्यांच्या मनांत गर्दी उडवून दिली असावी. कवि हा प्राणी सच्छील,

सत्त्वगुणसंपन्न, प्रेमळ, सौंदर्यपक्षपाती व शारदेचा एकान्त भक्त असतो या कल्पनेशीं अगदीं विसंवादी असे कित्येक कवि आणि वाङ्मयोपासक पाहून रा० अत्रे यांचें मन आश्चर्य, खेद व अनुकंपा यांनीं भरून गेलें असावें. अशा मन:स्थितींत 'झेंडूचीं फुलें' हें विडंबन-काव्य निर्माण झालें असावें असें वाटतें.

आतां प्रस्तुत पुस्तकाच्या अंतर्बाह्य स्वरूपाकडे थोडेंसें वळूं. हें पुस्तक षोडशपत्री क्राउन आकाराच्या अवघ्या पाऊणशें पृष्ठांचें आहे. यांत सुमारें पंचवीस प्रकरणें आहेत. त्यांत पहिलें गद्यात्मक व बाकीचीं सर्व पद्यात्मक आहेत. प्रत्येक प्रकरणांत विनोद आहेच; परंतु प्रत्येकांत उपहास आहेच असें मात्र नाहीं. विचित्र कविस्वभाव व अनुचित कविकृति हे विडंबनाचे विषय आहेत. कित्येक प्रकरणें केवळ काव्यविनोदार्थ रचिलीं आहेत. कविकृतीचें विडंबन यांत काव्यरूपानेंच केलें आहे, हा या पुस्तकाचा विशेष आहे. या बाबतींत हा असा प्रयत्न आमच्या माहितीप्रमाणें पहिलाच आणि म्हणूनच एका दृष्टीनें अपूर्व आहे. नाट्यकलारुक्कुठार एकाच नाट्यकाराच्या नाटयकृतींवर चालविला गेल्याचें स्मरतें. प्रस्तुत प्रयत्न कित्येक आधुनिक मराठी कवींच्या काव्यकृतीच्या कांहीं अंगांवर उभारला आहे.

उपहसित व्यक्ति किंवा कृति वाचकांना पटली म्हणजे उपहास सफल झाला व विडंबनकार कवीचें काम फत्ते झालें. प्रस्तुत पुस्तकांतले विडंबनविषय प्राय: मराठी काव्यभक्तांच्या परिचयांतले आहेत. त्यामुळें ते वाचतांक्षणींच विडंबित व्यक्ति अगर कृति एकदम डोळ्यांपुढें उभी राहून हंसें कोसळतें ! आरंभींचें 'जडजंबाल' याचें 'एकच वाक्य' पहा. जडजंबाल हा शब्द ऐकतांच त्यावरून ध्वनित होणारा दोषसमुच्चय मनश्चक्षूंपुढें उभा राहतो. त्याचें 'एकच वाक्य' वाचतांच तो दोषराशी चर्मचक्षूंचा व बुद्धीचा विषय होतो. जडजंबाल पंडिताच्या प्रदीर्घ व बोजड 'एकच वाक्यांत' अनेक काव्यदोष खचून भरलेले आहेत. मम्मटाचें सगळें दोषप्रकरण यांत उदाहृत झालें आहे असें म्हटलें तर अत्युक्ति होणार नाहीं. जडजंबालाचें भाषण किंवा लेखन ज्यांनीं ऐकलें किंवा पाहिलें असेल त्यांना 'एकच वाक्य' यामध्यें जडजंबाल मूर्तिमंत उतरलेला दिसेल यांत शंका नाहीं. 'चांफा' या कवितेचा कटाक्षही जडजंबालावरच आहे. 'श्यामले' या प्रकरणांतील मौज कांहीं और आहे ! मराठी काव्यवाङ्मयसीमेंत उर्दूचें फाजील प्रस्थ माजवून ज्यांनीं हैदोस मांडला आहे अशा एका पर्शियन साहित्य-

शास्त्र्याच्या 'श्यामले'ची यांत विडंबना आहे. विडंबनाचे सर्व प्रकार या कवितेंत अवतीर्ण झाले आहेत. विडंबनकारांची ही कामगिरी खरोखरच तारीफ करण्यासारखी आहे. 'मोहोरममधील मर्दुमकी' या प्रकरणांतही थोडासा तोच उपहास-प्रकार आढळतो. एकदां एका आधुनिक काव्यलेखकाचें त्याच्या चाहात्यांनीं इतकें कांहीं स्तोम माजविलें कीं, त्या बिचाऱ्या कवीला खरोखरीच वाटूं लागलें कीं, आपण कोणातरी असामान्य विभूति आहोंत. त्याचा परिणाम असा झाला कीं, तो कवि, आपला पद्यें रचण्याचा नेहमींचा उद्योग सोडून, काव्यशास्त्रमतंगजांशीं स्पर्धा करूं लागला! त्यास एक नवरसमंजरी निर्माण करण्याची हुक्की आली. पण हा त्याचा प्रयत्न खऱ्या रसिक पंडितांच्या उपहासास मात्र पात्र झाला! या रसशून्य रसमंजरीवर कटाक्ष ठेवून या पुस्तकांत 'नवरसमंजरी'–प्रकरण घातलें आहे. हें फार मधुर आहे. यांतील करुणांत प्रतिबिंबित झालेला करुणास्पद, बहुरूपी, अहंमन्य, लेखकब्रुव; बीभत्सांत गटंगळ्या खाणारा प्रियागुणस्मरणी-बहादर कवि; व वत्सलरसाच्या डोहांत डुंबून शुंडाग्रांनीं बाललीला करणारे वृद्ध-तरुण वाङ्मयमातंग यांचीं चित्रें प्रेक्षणीय आहेत. एका फोटोच्या प्रसंगीं अग्र-स्थान पटकविण्याकरितां अहमहमिकेनें धडपडणारे कित्येक कविकुंजर पद्यावरून गद्यावर व गद्यावरून गुद्द्यांवर कसे घसरत गेले, या प्रसंगाचा रौद्ररसांत सुंदर आविर्भाव झाला आहे. 'सखे, बोल बोल!' ही कविताही वरील पद्यकारासच अनुलक्षून लिहिली आहे. 'कषायपेयपात्रपतितमाक्षिकेप्रत' ही कविता पुण्यांतील एका वृद्ध व विद्वान् परंतु क्लिष्टकाव्यरचनाकुशल कविशार्दूलाची थट्टा आहे, हें सहज लक्षांत येईल. काव्याचा मथळा, आरंभ व शेवट, तशीच ओजःसंपन्न काव्यशैली या सर्व गोष्टी विडंबनांत खुलून दिसत आहेत. विषयचमत्कृतीनें व विषयाच्या विनोदप्रचुर विवरणपद्धतीनें या कवितेला उठावदारपणा आला आहे. क्षुद्र विषयाला अगडबंब स्वरूप देण्याच्या वृत्तीचा उपहास करण्याकरितां 'पाय घसरला तर' या प्रकरणाचा अवतार झाला आहे. 'कवीचीं विरामचिन्हें', 'आम्ही कोण?', 'पाहुणे', 'मनाचे श्लोक' या कविता केवळ काव्यविनोदार्थ रचिल्या असून त्यांत मूळांतल्याहून भिन्न परंतु सुंदर व मनोरम कल्पना ग्रथित केल्या आहेत. 'रस्त्यावर पडलेलें बिडीचें थोटूक' यांत एकाच विषयावर झालेल्या दोन सुनीतांची हजेरी घेतली आहे. 'कवि आणि चोर', 'प्रेमाचा गुलकंद', 'कानगुजला' इत्यादि चटका लावून सोडणाऱ्या कविता कित्येक कवींच्या

अधम भावना व रचना यांचा समाचार घेणाऱ्या आहेत. या पुस्तकांत पृष्ठांच्या खालीं प्रकरणबोधक व अन्यही टीपा दिल्या आहेत. त्या फार मार्मिक असून त्यांतही विनोदाच्या छटा दिसून येतात.

कवीला विडंबन काव्यांतील विषय प्रच्छन्नच ठेवावा लागतो; किंबहुना अशा गोपनामध्येंच विडंबनाचा सगळा रंग भरलेला असतो. गोप्य वस्तूची परिस्फुटता म्हणजे बेरंगप्रसंग. विडंबन काव्याच्या प्रस्तावनालेखकासही ही मर्यादा पाळावी लागते. या कारणास्तव या मर्यादेची अमर्यादा न होण्याविषयीं आम्हीं पूर्ण खबरदारी घेतली आहे. या पुस्तकांतील कांहीं विडंबित गृहस्थ रा० अत्रे यांचे स्नेही आहेत व त्यांना रा० अत्रे यांचें काव्य वाचून आनंद व कौतुक वाटलें असें समजतें. हें खरें असेल तर रा० अत्रे यांचा हा प्रयत्न यशस्वी झाला हें उघड आहे. आम्ही रा० अत्रे यांच्या अत्यंत निकटवर्ती सुहृदांच्या कोटींतले नाहीं. इतकेंच नव्हे, तर विरोधभक्तीनें त्यांनीं आम्हांसही प्रस्तुत पुस्तकांतच थोडासा विडंबनप्रसाद दिलेला आहे ! परंतु रा० अत्रे यांनीं या पुस्तकाच्या शेवटीं 'रसिकांचीं चेतवणी' या पद्यांत सुचविल्याप्रमाणें झेंडूंच्या 'तळिचें खोबरें' आम्हीं घेतलें व तें आम्हांस रुचकर व स्वादिष्ट लागलें, म्हणूनच आम्हांस त्यांच्या दोषदर्शनकलेचें कौतुक करावेंसें वाटतें. आमच्यासारख्या विडंबित व्यक्तीनें या पुस्तकाला लिहिलेला हा प्रस्ताव त्याच्या चांगुलपणाचा प्रबल पुरावा नव्हे काय ? असो. शेवटीं या बिसुकल्या, चुरचुरीत, चटकदार, चमत्कृतिपूर्ण, चारुतासंपन्न व चातुर्यमंडित ललित-पुस्तकाचें पुन्हा एकवार मनःपूर्वक अभिनंदन करून आम्ही श्रीयुत अत्रे यांची रजा घेतों.

सर परशुरामभाऊ कॉलेज, पुणें.<br>
श्रावण शुद्ध १५, शके १८५२.

लक्ष्मणशास्त्री लेले

म. ग्रं. सं. ठाणे.
काव्य ८५७

# झेंडूचीं फुलें

# कवि आणि चोर — [ खण्डकाव्य ]

दा. क्र. ४२४८

## एकच वाक्य !

मदीय कनिष्ठसहोदरसदृश कविसुहृद् श्री० केशवकुमार यांच्या सन्मान्य, प्रसादोत्कट व आदरयुक्त विनंतिपूर्वक प्रांजल आग्रहावरून, त्यांच्या या सहजरम्य, अव्याजमनोहर व सुश्लिष्टशब्दावगुंठित मौक्तिकप्रवाळमिश्रित 'सुवर्णगुटिके' समान अल्पमोली व बहुगुणी औषधाप्रमाणें किंवा 'त्वरित दान महापुण्य' अशा शीघ्रहितसाधन पुण्याचरणाप्रमाणें असलेल्या या आनंद व व उत्साहवर्धक लघु खंडकाव्यास अत्यंत साकल्यानें व विस्तारपूर्वक माझ्या पूर्वसांप्रदायास अनुसरून प्रदीर्घ प्रस्तावना न लिहितां, हें काव्य--जरी याचें नांव चमत्कारिक, मोघम व क्षीणशक्ति असलें तरी-तें वृत्तवैचित्र्यपूर्ण, पथ्यकारक, सात्त्विक ईर्ष्यायुक्त, मार्मिक, सद्धेतुमूलक व उन्नत मनोरंजनकारक आहे असें सांगून, तसेंच तें बिंदुस्रावी अर्कसुभाषितासमान कसिपूर्ण आहे असें आश्वासून, व त्याचें कौतुकयुक्त व उत्तेजनमिश्रित अभिनंदन करून श्रीज्ञानोबारायांच्या प्रेमळ 'पसायदाना'नें तें रसिकांच्या हवालीं करतों.

> आतां विश्वात्मकें देवें। येणें वाग्यज्ञें तोषावें
> तोषोनि मज द्यावें। पसायदान हें ॥१॥
>
> जे खळांची व्यंकटी सांडो। तया सत्कर्मीं रती वाढो
> भूतां परस्परें जडो। मैत्र जीवांचें ॥२॥ इ०

रविवार,<br>वैशाख वद्य षष्ठी शके १८४९

जडजंबाल.

ता. क.—'दोन शब्दांच्या साळसूद मथळ्याखालीं शब्दसृष्टीची ऐसपैस पोतडी खोलणाऱ्या सांप्रदायिक प्रस्तावनाकारांच्या डोळयांत विद्वद्वर्य श्री० जडजंबाल यांच्या या 'एकाच वाक्या'नें झणझणीत अंजन बसेल याबद्दल रसिकांची एकवाक्यताच होईल अशी आशा आहे !

—कवि केशवकुमार.



# कवि आणि चोर

[ अंतःकरणाच्या अमर्यादित आवारांत बेहद् ब्रह्मानंदाची बादशाही बदफैली म्हणजेच मायेच्या मोहक मृगजळाची आत्यंतिक उत्कटता ! विश्वस्वरूपी भगवंताच्या साक्षात्काराच्या प्रेमळ प्रचीतींतून प्रादुर्भूत झालेलें प्रेम हें संसार-सोपानाच्या शेवटच्या पायरीवरील उंबरठ्यावर उभारलेल्या दयेच्या देवळाचा कांचनी कळसच ! प्रेमाचा द्वेष, दानाचें चौर्य, विश्वाचें शून्य याच सूत्रत्रयीवर काव्याची उभारणी होते.*]

शा० वि०— काळाकुट्ट नभामधें पसरला अंधार चोहींकडे,
होते घोरत प्राणिमात्र सगळे निद्रेमधें बापुडे;
भीतीनें अगदीं मुकाट बसलीं होतीं घरें देवळें,
विश्रांतीसुख घेत राजपथही होते जरा बैसले.

अनुष्टुभ्— या भयाण अशा वेळीं कवी आणिक चोरटे,
राहतील दुजे जागे जीव यांविण कोणते ?

---

* सदरहू ब्रह्मवाक्याचा पुढील काव्याशीं कोठल्याही प्रकारचा संबंध नाहीं हें सांगावयास पाहिजे काय ?

शा० वि०— रात्रीची अनुकूल वेळ बघुनी कामास तों एकटा,
चाले वाजवितां न पाउल कुणी रस्त्यांतुनी चोरटा
घेई चाहुल तो मधूनमधुनी मागेंपुढें पाहुनी,
आकाशीं जरि चांदणें न, तरि तें होतें तयाच्या मनीं !

श्लोक— तों घरांत दिसला कुठल्या दिवा,
थांबला मनिं चपापुनि तेधवां !
शांत विश्व सगळें जरि जाहलें,
कोण जागत अजूनहि बैसलें ?

कामदा— त्यांत आणखी दारही खुलें
बघुनि त्याजला नवल वाटलें !
"धनि विचित्र हा कोण ?" बोलला,
"भय न आमुचें काय याजला ?"

आर्या— जिज्ञासा उपजे मनिं धाडसवृत्तीहि जाहली जागी;
बोले, "भवानिची ही वेळ नसे मुळिंच दवडण्याजोगी !"

कामदा— जवळ जाउनी चोरपाउलीं
नजर चोरटी आंत टाकली !
आणि आंतलें दृश्य पाहुनी
थक्क जाहला क्षणभरी मनीं !

साकी— दिवा टांगता जळे मधोमध दालनांत चौकोनी,
मेजावरतीं लिहित एकटा गृहस्थ बैसे कोणी;

दिंडी— समिप होते उघडले ग्रंथ जाडे,
कागदाचीं आणखी तशीं बाडें;

त्यांत बघुनी सारखा झपाट्यानें
लिहित होता कायसें मुकाट्यानें !
मधुनमधुनी तो गुणगुणे मनाशीं,
हस्तचेष्टाही करी स्वैर तैशी !
आणि मिटल्या ओंठांत हंसूं येई,
गूढ कसला आनंद तया होई ?

साकी— पाल पाहुनी जसा बिचारा विंचू टाकी नांगी,
तसा आमुचा नायक खिळला उभा जागच्या जागीं !
भान विसरला, कार्य विसरला टकमक पाहत राही,
वेळ लोटला असा किती तरि स्मरण न त्याचें कांहीं !

अनुष्टुभ्— तिहीचा पडतां ठोका काळयंत्रीं ठणाठणा,
थांबला लेखकू तेव्हां, संपवी जणुं लेखना !

इंद्रवज्रा— निश्वास टाकून बघे समोर
तों आपुला दत्त समीप चोर !
भीती असावी परि त्या कुठून ?
" सुस्वागतम् ! " त्यास म्हणे हंसून !

शिखरिणी— " बरे आलां, " बोले, " कवन इतुक्यामाजिं रचिलें,
नसे श्रोता कोणी म्हणुनि मन होतें विरजलें !
बसा, गातों आतां मम कवन हें सुंदर नवें
दुजें किम् शाहीरा जगतिं रसिकांवांचुनि हवें ? "

शा० वि०— ओशाळा मनिं चोर होय अगदीं, अन् मान खालीं करी
बोले, " माफ करा, नसे किमपिही मी योग्य मानास या !

आहें मी बदमाष एक जगतीं बोलूनिचालूनिया,
हेतू दुष्ट अहो, मनीं धरुनियां मी पातलों या घरीं !"

कामदा— खदखदां तदा हांसला कवी
"मग," म्हणे, "तुझी फार थोरवी !
मी तरी तुझा बंधु थोरला !
धर्म एक ना श्रेष्ठ आपुला ?"

शा० वि०—"आर्या, हें भलतेंच काय वदतां ?" उद्गारला चोरटा,
"माझ्या पंक्तित शृंगभंग करुनी कां येउनी बैसतां ?"
"मित्रा, यांत न वावगें, कथितसें मी सत्य !" बोले कवी,
"चौर्याची मम खाण ही !" वदुनियां ग्रंथांस तो दाखवी !

दिंडी— "सोनियाचे दागिने चोरसी तूं;
कल्पनांचे शिणगार मी परंतू !
हिऱ्यामोत्यांवर सदा तुझा डोळा,
शब्दमौक्तिक मी सदा करित गोळा !

साकी— "चोरीसाठीं काळ्या रातीं वेष घेउनी काळा,
गल्लोगल्लीं उगाच फिरसी, भय प्राणाचें तुजला !
बघ मेजावर माझ्या पडलें खुलें रत्नभांडार,
लूट तयाची खुशाल करितों, कोण मला धरणार ?
एकटाच तूं फिरसी, असती परी आमुचे कंपू,
वाङ्मयवैभव खुशाल आम्ही दिवसाढवळ्या कापूं !
कळपामाजीं येशिल माझ्या जरि तूं काळ्या दोस्ता,
काव्यकीर्तिचा दाविन तरि मी सवंग तुजला रस्ता !

जरी बोलण्यावरतीं माझ्या असे तुझा विश्वास,
हृदयावरतीं कोरुनि ठेवी तरि हा मम उपदेश !

अनुष्टुभ्— **धन्य तें चौर्य जाणावें अब्रू जें जगिं वाढवी,**
**धिक् धिक् चौर्य मित्रा, जें नांवलौकिक घालवी !"**

शा० वि०—चोराला उपदेश कोठुनि रुचे ? वंदून त्या वाग्भटा,
झाला कांहिं न बोलतां हळुहळू तो आपुला चालता;
त्या रात्रीं नृपरक्षकें पकडलें तों हन्त ! कोठें तया,
शिक्षा होउनि बंदिवास पुढतीं तो जाय भोगावया !

[ २ ]

दिंडी— काय इकडे जाहलें वर्तमान,
कवी झाला आमुचा कीर्तिमान !
सुनीतांच्या ओंजळी भरुनि त्यानें
मासिकांचीं व्यापिलीं किती पानें !
खंडकाव्यें लिहिण्यांत हातखंडा,
असा त्याचा फडकला कीर्तिझेंडा !
नांव आलें शेवटीं 'परिषदेंत' !
स्वर्ग तेव्हां राहिला दोन बोट !
आणि तिकडे फोडितो खडी चोर,
यातनेला त्याच्या न मुळीं पार;
द्रव्य नाहीं—अब्रूहि तशी गेली,
उलट हातीं शृंखला अडकलेली !

स्वागता— आठवूनि कितिदां कविवाणी,
स्फुंदुनी मग रडे शिशुवाणी,

" हाय, मूर्ख किति मी हतदैवी,
बोध तो न रुचला मज केवी ? "

अनुष्टुभ्–**" धन्य तें चौर्य जाणावें, अब्रू जें जगिं वाढवी,**
**धिक् धिक् चौर्य मित्रा, जें नांवलौकिक घालवी ! "**

साकी— सहस्र वेळां श्लोक तयाच्या ओंठावर हा खेळे,
सत्य तयांतिल मनीं तयाच्या पूर्णपणें मग ठसलें !
छातीवरतीं हात मारुनी म्हणे, "सोडिला धंदा,
येथुनि पुढतीं गुलाम होइन मी कवितेचा बंदा ! "

[ ३ ]

शा० वि०—शिक्षेचा सरतांच काळ सुटला तो बंदिखान्यांतुनी,
जाई धांवत भेटण्यास कविला तात्काळ तो तेथुनी.
गेलें अंतर गद्गदून पडतां दृष्टीस वागीश्वर
घाली सत्वर तो नमस्कृति तया साष्टांग पायावर !

अनुष्टुभ्— " त्राहि मां नरकाद् घोरात् सद्गुरो, शरण मी तुला,
कृपेचा वर दे बापा, तूंच आधार एकुला !
**धन्य तें चौर्य जाणावें, अब्रू जें जगिं वाढवी,**
**धिक् धिक् चौर्य मित्रा, जें नांवलौकिक घालवी !**

स्वागता— " सत्य हें वच तुझें कविराया,
आज पूर्ण पटलें हृदयीं या !
ठेव त्वत्कर गुरो, मम माथां
ना तरी गति नसे मज आतां !

पृथ्वी— " किती दरवडे अगा, अजवरी जगीं घातले,
परी न कवडी उरे; नरकवत् जिणें जाहलें !

गुरू न मज भेटला तुजसमान वागीश्वरा,
प्रसाद तरि देउनी मजसि यांतुनी उद्धरा ! ”

ओंवी— काय सांगावें अद्भुत । गुरू जाहले सद्गदित,
शर्विलकाच्या मस्तकीं हस्त । ठेविला तात्काळ पां !

बोले, “ चौर्यकर्मविशारदा । तूंतें प्रसन्न होवो शारदा,
परी पूर्वींचाच धंदा । अविरत चालवी !

परवाङ्मयाचीं भांडारें । आपुल्यासाठींच ना बारे ?
खुलीं तयाचीं तुजला दारें । शंका न धरी !

भय न धरावें कवीनें । लाज न धरावी कवीनें
तरीच तयातें विमानें । नेतील स्वर्गीं !

धन्य कवी, धन्य चोर । धन्य डाकू, दरवडेखोर,
काव्य सर्वांना आधार । हस्तकौशल्य दावाया ” !

ऐसें आशीर्वच देऊन । कवि देई प्रेमालिंगन
तें दोघांचें संमेलन । देव आले पहावया !

पृथ्वी— पुढें कवनलेखनीं कुशल चोर तो जाहला,
स्वतंत्र–कृतिचा कवी म्हणुनि मान्यता पावला !
‘चतुर्भुज’ न जाहला फिरुनि त्यापुढें तो जरी,
करी कवननिर्मिती करचतुष्टयें तो तरी !

---

## ता॰ क॰

गुप्त ही गोष्ट राखावी रसिका, हीच प्राथना,
आंतल्या आंत ठेवाव्या कवींच्या गूढ या खुणा !

**ॐ शांतिः ! शांतिः ! शांतिः !**

---



# कादरखां

[ मुंबईच्या नुकत्याच झालेल्या हिंदू-पठाणांच्या दंग्यांत गारद झालेल्या एका पठाण वीरास उद्देशून सदरहू 'विलापिका' रचिली आहे.]

हा कोण इथें पडलेला ? 'कादरखां काबुलवाला' ॥ध्रु०॥
धिप्पाड देह हा अडवा । पसरला सहा अन् फूट !
पालथे पलिकडे पडले । विक्राळ खिळ्यांचे बूट !
चुणिदार चोळणा आतां । फाटून होय चिरगूट !
बैसला पठाणी बडगा । बाजूला दूर निमूट !
चिखलांत बुडाले कल्ले !
त्या ओढिति चिल्लेंपिल्लें !—
खिसमीस खिशांतिल उरलें
कुणि मारि तयावर डल्ला । 'कादरखां काबुलवाला' ! १
अफगाण–दऱ्यांतिल आतां । डुरकाळ्या फोडिति शेर !
बुरख्यांतुनि कंदाहारी । उडलासे हाहाःकार !
तो शरबत पीतां पीतां । दचकेल मधेंच अमीर !
'क्या हुवा' ओरडुनि ऐसें । बडवितात सगळे ऊर !

ते हेरतचे अक्रोड
ते बदामपिस्ते गोड—
रडरडुनी होती रोड !
अल्बुखार अंबुनि गेला। 'कादरखां काबुलवाला' २

तो हिंग काबुली आतां। विकणार यापुढें कोण ?
व्याजास्तव बसुनी दारीं। गरिबांचा घेईल प्राण ?
खाणार कोण या पुढती। तीं कलिंगडें कोरून ?
सजवील नूर नयनांचा। कीं सुरमा घालुनि कोण ?
रस्त्यावर मांडुनि खाटा
हुक्क्यासह मारिल बाता--
हिंडेल कोण वा आतां !
घालून चमेलीमाळा ?। 'कादरखां काबुलवाला' ३

करुं नका गलबला अगदीं। झोंपला असे हा वीर !
जन्मांत असा पहिल्यानें। पहुडला शांत गंभीर !
राहणें जितें, तरि मागें। व्हा दोन पावलें दूर !
हा बसेल मानगुटीला। ना तरी होउनी पीर !
जा पळा-पंचनाम्याला
तो आला डगलेवाला,--
अडकाविल कीं साक्षीला,
मग म्हणाल, "पुरता भंवला। कादरखां काबुलवाला!" ४

# सांग कसे बसले ? गडकरी.

[ आचरटपणाचा एक मासला ]

ओळख होतां पहिल्या दिवशीं,
पूर्वजन्मिची मैत्री जैशी,
मिठ्या मारुनी परस्परांशीं
जवळ जवळ बसले !

दुसऱ्या दिवशीं प्रसंग पाहुन
हळुच काढिती बाड खिशांतुन,
म्हणतां " दावुं जरा का वाचुन ?"
दूर—दूर—सरले !

" हवें काव्य तव भिकार कोणा ?
चोरितोस माझ्याच कल्पना ! "
असें बोलतां परस्परांना—
सांग कसे बसले ?

———

# फूल, कवि, बाला आणि मासिक

[ एक शोकपर्यवसायी कथा ]

**दिंडी**

कुठें रस्त्यावर कुणीं टाकिलेलें
कुणा कविच्या नजरेस फूल आलें;
तडक घेई उचलून करीं त्यातें
( ब्रीद कविचें वेंचणें जें दिसें तें ! )
तोंच दिसली मार्गांत एक बाला,
( कवी प्रेमाचा नेहमीं भुकेला ! )
फूल अर्थात् तिज द्यावयास गेला—
जीभ काढुनि ती फक्त दावि त्याला !
खूप रडला कवि ( नेहमींप्रमाणें )
प्रेम-कविता लिहि ( तरी चार पानें ! )
मासिकाला पाठवी त्याच वेळीं
हाय ! तीही साभार परत आली ! !

---

स्थळ ... म. सं. सं. ठाणे.

# पाहुणे

[ केशवसुतांची 'दंवाचे थेंब' ही कविता वाचल्यानंतरच पुढील विनोदी कवितेचें रहस्य लक्षांत येईल.]

" कोठुनि हे आले येथें ?
 काल संध्याकाळीं न्व्हते ! !—"
पाहुणे पसरले ओटी —
 वरि बघुनी आज प्रभातीं
आईला बाळ्या वदला
 कुतुकानें उत्सुकलेला.
" दिसती हे कोणी आले
 आपुल्याच नात्यामधले !
आई ग ! तर वद मातें
 कोठुनि हे आले येथें ?
तंबाखू पानें खात
 कसे पहा बडबडतात !
उघडुनी डबा ग अपुला
 राजरोस करिती हल्ला !
बाबांच्या पेटींतुन गे
 पळविती विड्यांचे जुडगे !
मौज मला यांची वाटे
 होते हे तर वद कोठें ? "
" हं हळू बोल —" तनयातें
 वर करुनी बोट वदे ते—

" कावळे गिधाडें घारी  
येतीं हीं जेथुनि सारीं;  
डोंगळे, डांस, घुंगुरटीं  
बाळा रे, जेथुनि येतीं;  
खोकला, ताप हीं दुखणीं  
आपणांस येतीं जिथुनी;  
तेथुनीच आले येथें  
हे छळावया आम्हांतें ! "  
" राहतील येथें का ते ?  
अडवितील का ओटीतें ?  
करतिल का भिंतीवरतीं  
ही अशी लाल रंगोटी  
जातील कधीं हे आई ?  
घरदार न यांना कांहीं ? "  
" नाहीं रे ! ते इतुक्यांत  
जाणार गड्या नाहींत !  
जोंवरी भीड आम्हांतें  
जोंवरी लाज ना यातें,  
तोंवरी असा बाजार  
सारखा इथें टिकणार !  
चडफडणें बघुनी त्यांतें  
असती ते जोंवरि येथें !  
टोळधाड कधिं ही इथुनी  
जाणार न लौकर सदनीं ! "

'जाणार न लौकर सदनीं !'
वदतां गहिंवरली जननी;
पाहुणे मागले स्मरले,
डोळ्यांतुन पाणी आलें.
बहुतेक तयांतिल आतां
जाहले कुठें बेपत्ता !
निगरगट्ट परि त्यांमधला
एक मात्र अजुनी उरला !
सरले जरि बारा महिने
तरि बसे देउनी ठाणें !
" देवा रे " मग ती स्फुंदे
" एवढा तरी जाऊं दे ! "
म्हणुनि तिनें त्या बाळाला
तो महापुरुष दाखविला !
एकेक बघुनि त्या मूर्ती
गोठली कविची स्फूर्ती !
वेडावुनि तयाच नादें
" खरेंच," तो पुसतो खेदें,
" येती हे रोज सकाळीं
परि जाती कवण्या काळीं ? "

---

# आम्ही कोण ?

( सुतक* )

[ केशवसुत, क्षमा करा ]

'आम्ही कोण ?' म्हणून काय पुसतां दांताड वेंगाडुनी ?
'फोटो' मासिक पुस्तकांत न तुम्हीं कां आमुचा पाहिला ?
किंवा 'गुच्छ' 'तरंग' 'अंजलि' कसा अद्यापि ना वाचिला ?
चाले ज्यावरतीं अखंड स्तुतिचा वर्षाव पत्रांतुनी ?
ते आम्ही–परवाङ्मयांतिल करूं चोरून भाषांतरें,
ते आम्ही–न कुणास देउं अगदीं याचा सुगावा परी !
डोळ्यांदेखत घालुनी दरवडा आम्ही कुबेराघरीं !
त्याचें वाग्धन वापरून लपवूं हीं आमुचीं लक्तरें !
काव्याची भरगच्च घेउनि सदा काखोटिला पोतडी,
दावूं गाउनि आमुच्याच कविता आम्हीच रस्त्यामधें,
दोस्तांचे घट बैसवून करुं या आम्ही तयांचा 'उदे' !
दुष्मानावर एकजात तुटुनी कीं लोंबवूं चामडीं,
आम्हांला वगळा–गतप्रभ झणीं होतील साप्ताहिकें !
आम्हांला वगळा–खलास सगळीं होतील ना मासिकें !

---

*झेंडू पुस्तक फार्मसीचे अध्यक्ष मौलाना अल्लाउद्दीन खिलजी यांनीं इंग्रजींतील 'सॉनेट' या काव्यप्रकारास 'सुतक' हा समानध्वन्यर्थक शब्द सुचविलेला आहे. 'फार्मसीं'तील साप्ताहिक मजलशींत यावर 'पानपतच्या लढाया' होऊन शेवटीं मशारनिल्हे शब्द मुक्रर करण्यांत आलेला असून त्याचीं पुढील तीन रूपें ठरविण्यांत आलीं आहेत. सुतक–सपिंडी हें १४ ओळींचें, सुतक–सगोत्री हें १० ओळींचें व सुतक–सप्रवरी हें ३ ओळीचें असावें. याविषयीं विस्तृत माहिती मौलानासाहेब लवकरच पुस्तकरूपानें प्रसिद्ध करणार आहेत.

# मोहरममधली मर्दुमकी

[ प्रस्तुत कथाप्रसंग काल्पनिक आहे अशी थाप मारली असती; परंतु त्याची नोंद फौजदारी कचेरीच्या दप्तरीं दाखल असल्याकारणानें, तो सत्यसृष्टींतील आहे हें मुकाट कबूल करावयास हवें. फरासखान्यांतील आमच्या ७ दिवसांच्या मुक्कामांत सदरहू कवितेची पैदास झालेली असून पोलिस अधिकाऱ्याच्या परवानगीनें ती आज प्रसिद्ध होत आहे; तथापि, तिजमधील बराच भाग हिंदु-मुसलमानांमध्यें फाजील सलगी उत्पन्न करण्यासारखा—अतएव, आक्षेपार्ह असल्यामुळें सरकारजमा करण्यांत आलेला आहे. रसिकांना तिचें मूलस्वरूप पहावयास मिळणार नाहीं या विचारानें मनांत राहून राहून वाईट वाटतें इतकेंच काय तें.]

[ उद्धव-वृत्त ]

गेल्याच सालचा होता । सण मंगल मोहोरमंचा,
कोइबी बात वदण्याचा । दिल चाहिल तें करण्याचा !
बेहोष धुंद पडण्याचा । मजलशी आणि जलशांचा;
हिंदुचा, मुसलमीनांचा,
राष्ट्राचा, सब् दुनियेचा,
ऐक्याचा, स्वातंत्र्याचा,
मग एकच झाला गिल्ला । 'हैदोस दुलाबे धूला !'
अंगाला फांसुनि पिवडी । ओढुनिया काळे पट्टे,
जाहले पटाइत वाघ । धर्मवीर कोणी कट्टे,
मागण्या फकीरी सजले । हिंदूंतील कोणी पट्टे,
ताबूत-बांधकामाला,
प्रारंभ चहुंकडे झाला,
बेहोष मिठाईवाला,
रेवड्या पाडण्या बसला । 'हैदोस दुलाबे धूला !'

उगवला दिवस भाग्याचा । या अल्ला, पण रविवारीं !
हकनाक बुडाली सुट्टी । शिरलें हें शल्य जिव्हारीं,
पण इलाज याला कसला । करणि ही खुदाची सारी;
आनंद कांहि तो और,
क्यां कहुं मैं तुमकू यार ?
जिव झाला कत्तल-ठार !
अंगांत पीर संचरला । 'हैदोस दुलावे धूला ।'

ओळिनें निघाले सारे । थाटानें ताबुत खूप;
बादशाहि वैभव त्यांचें । वर्णील ना कविचा बाप !
जनगर्दी रस्तोरस्तीं । लागुनी राहिली थाप !
वर माडीच्या सज्जांत,
मी बसलों होतों शांत,
रेवड्या भरून खिशांत,
लावुनी अबीर कपाळा । 'हैदोस दुलावे धूला !'

आठवले तों एकाकीं । हूसेन आणखी हासन्
पोटांत कालवुनि आलें । डोळ्यांत पाणि ये टच्कन्
वाटलें काय हृदया अन् । तें सांगू कसें मी भगवन् !
ते स्वार्थत्यागी वीर,
लढवय्ये बेदरकार
मेले कां आतां पार ?
नामर्द देश हा बनला । या अल्ला, या बिसमिल्ला !

हा विचार येतां हृदयीं । अंगाची होई आग,
राष्ट्राच्या उजळ यशाला । लागला कसा हा डाग ?
करकरा दांत चावोनी । मग उठलों मी सावेग,

रेवड्या करीं भरलेल्या,
भिरकावुनि सगळ्या दिधल्या,
त्या वर्मी कुणाच्या बसल्या,
मग उडे चहुंकडे गिल्ला । 'हैदोस दुलावे धूला'!

मी सावध नव्हतों, जेव्हां । मज नेलें चौकीवरतीं,
चौकशी कराया सगळी । मग पोलिस जमले भंवतीं;
मी कोण कोठला म्हणुनी । खोदुनी खोदुनी पुसती,
छातीवर मारुनि हात,
राहिलों उभा मी ताठ,
बोलिलों खाउनी दांत,
'जा तुम्हां न डरनेवाला । जाणतों एक मी अल्ला !'

त्या इब्राहीमा जैसा । तो याकुब भ्याला नाहीं,
अवरंगजेबरायाला । कीं जैसा संभाजीही,[१]
तैसाच तुम्हां मी मानी । भय मनीं न माझ्या कांहीं !
पाठवा कुठेंही मजला,
कुठल्याहि तुरुंगीं घाला,
होणार न कांहीं त्याला
जो जपे सदा, बिसमिल्ला । इल् इलाह या रसुलिल्ला ![२]

---

१ कुराण ७-२४-१२१. २ कुराण १२-१-८७.

# सखे, बोल-बोल

[ सदरहू कविता लिहिल्यास पुष्कळच वर्षे झालीं. इतके दिवस ती कवीच्या दप्तरीं पडून होती. ती आज प्रसिद्ध करण्याचें कारण म्हणजे, नुकतीच कोठेंतरी एका ज्येष्ठ सत्कवीची सदरहू मथळ्याची व धर्तीची कविता प्रसिद्ध झाली असून ती प्रस्तुत कवितेचें अगदीं अंध अनुकरण होय हें रसिकांच्या नजरेस आणण्याकरितांच होय. अनुकरण करूं नये असें आमचें म्हणणें नाहीं; पण नक्कल करतांना अस्सलाचा कृतज्ञतापूर्वक उल्लेख तरी करावा; तथापि, या ठिकाणीं आनंदाची गोष्ट इतकीच कीं. सत्कविमजकुरांनीं आपल्या अनुकरणांत सदरहू कवितेला चारी मुंडे चीत केलें आहे, हें कबूल करणें भाग आहे.]

[ वसंततिलका ]

कां सुंदरी, धरिसि आज असा अबोला ?
मीं काय सांग तव गे अपराध केला ?
कां कोपऱ्यांत बससी सखये, रुसून
माझ्याकडे न मुळिं पाहसि गे हंसून ?

कां गाल आज दिसती अगदीं मलूल,
कीं माझियाच पडली नयनांस भूल !
तोंडावरी टवटवी लवलेश नाहीं,
ओंठावरी दिसत लालपणा न कांहीं !

कां केश हे विखुरले सखये कपाळीं,
केली न काय अजि वेणिफणी सकाळीं ?
भाळीं न कुंकुं विलसे, नथणी न नाकीं,
हातांतही न मुळिं वाजति गोठवांकी !

कोठें तुझा वद असे शिणगारसाज,
कां नेससी मलिन हें पटकूर आज ?

मराठी ग्रंथ संग्रहालय ... दा. क्र. ४२८८ ... शाखा (स्थळ ...

ठेवूनिया हनुवटी गुडघ्यावरी ही
 कां एकटीच बसलीस विषण्ण बाई ?

व्हावा तुला जरि असेल पदार्थ कांहीं,
 घे नांव—तो मग कुठें असुंदे कसाही,
द्रोणागिरीसह जसा हनुमन्त येई,
 बाजार आणिन इथें उचलून तेवी !

कीं आणसी उसनवार सदा म्हणून,
 शेजारणी तुजवरी पडल्या तुटून;
वाटून घेइ परि खंति मना न कांहीं,
 शेजारधर्म मुळिं त्या लवलेश नाहीं !

भाडें थके म्हणुनि मालक देइ काय
 गे आज 'नोटिस' ? परी न तया उपाय !
घेऊन काय बसलीस भिकार खोली,
 बांधीन सातमजली तुजला हवेली !

वाटेल तें करिन मी सखये, त्वदर्थ,
 संतोषवीन तुज सर्व करून शर्थ !
टाकी परी झडकरी रुसवा निगोड !
 दे सुंदरी, मजसि एकच गोड—गोड—

गेलों पुढें हंसत जों पसरून हात,
 तों ओरडून उठली रमणी क्षणांत—


" व्हा दूर—चावटपणा भलताच काय ?
स्पर्शूं नका !"
कडकडे शिरिं वीज !!
हाय !!!

---




[ सदरहू दोन सुनीतें एकाच विषयावर आणि एकाच सुमारास लिहिलेलीं असून तीं शुद्ध शास्त्रीय पद्धतीचीं व स्वदेशी वनस्पतीचीं आहेत याबद्दल सुनीतपंथी शाहिरांकडून शेरा मिळालेला आहे. मात्र तीं रचण्यांत इंग्रजींतील 'सॉनेट' या काव्यप्रकाराची कुचेष्टा करण्याचा कवीचा उद्देश आहे असा समज होऊं न देण्याबद्दल वाचकांच्या दाढीला हात लावून विनंति आहे.]

— १ —

भाजी मंडइंतूनि घेउनि घरा होतों हळू चाललों,
मोठें कामच संपलें म्हणुनि मी चित्तांत आनंदलों.
  दारीं वाट असेल पाहत सखी आतां समुत्कंठिता,
  होतों डोलत कल्पनेंत असल्या मी चालतां चालतां !

तों रंगेल गृहस्थ एक पुढुनी ऐटींत आला कुणी,
चंदेरी पगडी शिरीं चकचके संजाबही त्यांतुनी.
  होता अंगरखा सफेत कळिचा, हातीं रुप्याची छडी,
  तोंडीं बारिक छान मानुरकरी होती लवंगी विडी !

जोरानें झुरके मधूनमधुनी मारी—अधाशी जसा,
सोडी धूर मुखांतुनी हळुहळू, नाकांतुनीही तसा,
  ओंठाला चटका बसे, मग कुठें आला ठिकाणावरी,
  खालीं थोटुक फेंकुनी झपझपा गेला पुढें सत्वरीं,
माझी जागृत जाहली रसिकता, मागेंपुढें पाहिलें,
कौशल्यें उचलून तें तडक मीं टोपीमध्यें खोंविलें !

— २ —

झाला त्या दिवशीं पगार, तरिही होते खिसे मोकळे,
तांब्याचा तुकडा नुरे, चुकवितां देणेकऱ्यांचीं 'बिलें';
आधीं पोरवडा तशांतुनि असे संसारही वाढता,
कांता खर्चिक त्यांत ! शिल्लक कशी सांगा रहावी अतां ?

हा येतांच विचार, मूढ बनलों आली उदासीनता,
वाटे स्वस्थपणें कुठें तरि विडी जाऊन प्यावी अतां !
आली तल्लफ फार हाय ! कुठुनी आणूं परंतू विडी,
सारे चांचपले खिसे, परि कुठें हातां न ये एवढी !

दोस्तांच्या घरिं जावया न मजला होतें कुठें तोंडही,
पैशाचेंहि उधार घेइन तरी, कोठें नसे सोयही !
तों रस्त्यावरतीं अचानक अहा ! नेत्रा दिसें थोटुक
कीं स्वर्गांतुनि देवदूत मज तें टाकी नसे ठाउक !

प्रेमानें उचलून त्यास वरतीं ओंठामधें ठेविलें,
काडी घेऊनि आणि कोठुनि तरी तात्काळ शिल्गावलें !

# कषाय-पेय-पात्र-पतित मक्षिकेप्रत[1]

'हा हन्त हन्त नलिनीं गजमुज्जहार !'

अयि नरांग-मल-शोणित–भक्षिके,
जनु-विनाशक-जंतु-सुरक्षिके, !
असु-परीक्षित-हारक-तक्षिके,
'क्या हुवा अफसोस !' मक्षिके
या प्रभातसमयास मंगल,
चमकती दंवमौक्तिक निर्मल,
गात[2] पक्षिगण हा गगनीं फिरे,
पण दशा तव काय ? अरे–अरे–!
ओसरीवरुनि या तव मैत्रिणी
गात स्वैर फिरतात सुलक्षणी
परि तुला न बघती मुळिं ढुंकुनी
'संकटीं जगिं कुणा न असे कुणी !'
मंडई नव्हति का तुज मोकळी,
कीं मिठाइ 'मथुरा[3]-भुवनां'तली,

---

१ कषायपेय–चहा, पात्र–भांडें, एकूण चहाचा कप त्यांत पडलेल्या माशीस उद्देशून. २ माशांचें गाणें निव्वळ माशा मारीत बसणाऱ्या लोकांना कोठून ऐकूं येणार ! जावें त्याच्या वंशीं तेव्हां कळे ! ३ उदबत्त्यांनीं पुण्यांत म्हैसूर आणलें तर आटीव दुधानें पुण्यांत मथुरा आणली. सदर 'भुवनां'तून मिठाईबरोबर माशाही मनमुराद मिळतात.

नव्हतीं कां ‘उपहार[1]-गृहें’ खुलीं,
    म्हणुनि आलिस नेमकि या स्थळीं !
त्यजुनि शांत शहरांतील बोळ ते,
    मनुजवास्तिंत आलिस कां इथें !
करित ‘दत्तु–भट[2]’ काय तपासणी
    म्हणुनि घाबरुनि आलिस तूं झणीं !
शर्कराकण येथिल सांडले
    सेवुनी न तुज सौख्य जाहलें ?
कीं ‘यमी’ करिंचें गुळखोबरें,
    शमवि भूक न काय तुझी बरें ?
पेय बोलुनिचालुनि घातकी,
    बुडवितें बघ भारतियास कीं,
या अशा व्यसनांत विलायती,
    अडकतां फळ दारुण शेवटीं !
नर जसा बुडतो भवडोहीं
    तेंवि खालिंवर जासि अयाई !
काडि वांचवि तरी बुडत्याला,
    काडिचा न परि आश्रय गे तुला !

---

१ प्रस्तुत शब्दांतील एका मात्रेचा फराळ पुण्यांतील ‘हॉटेलां’नीं केला असल्यामुळें येथें मात्रादोष अपरिहार्य आहे. २ सदरहू महात्म्याच्या नांवाचा कएवचनी उल्लेख केवळ त्या ओळींत अधिक शब्द बसेनात म्हणूनच केलेला आहे याबद्दल उदार रसिक क्षमा करतील अशी आशा आहे. आपद्धर्म नेहमीं क्षम्यच असतो.

स्थिति तुझी करुणास्पद ही अशी,
बघुं तरी उघड्या नयनीं कशी ?
अंगिं तैंविं भरलें भयकांपरें,
आणि त्यांत निवला न चहा बरें !
हाय ! सोडुनि जाशिल ना अम्हां,
छे, सले नुसती मनिं कल्पना !
समिप पाउसकाळहि पातला,
आणि तूं निघुनि जाशिच आजला !
अहह, आम्रफळ-मोसम[१] येइल,
अम्हि[२] असूं परि तूं नसशील !
फेंकु सालटिं चोखुनिचोखुनी,
तुजविना पण जातिल वाळुनी
तुजविना कवि-मुखें दिसतील कीं,
भृंगहीन कमळासम तीं फिकीं,
'कौन्सिलांत, सभासद आणी,
मारतील कवणा तुजवांचुनी ?
राजकारण रोज नवें नवें,
राष्ट्रभक्त करण्यास तयार हे.

---

१ सदरहू समासांतील मिश्र उत्पत्तीच्या शब्दांचा उघड उघड संकर केल्या-मुळें पटेल बिलाला प्रस्तुत कवीचा पाठिंबा आहे अशी गैरसमजूत आर्य वाचकांनीं करूं नये. २ सदरहू मात्रालोप हेतुपुरःसर करतांना कवीला पुढील ओळीचा अभिमानानें उल्लेख करावासा वाटत आहे. 'स्वराज्य आणि त्यासवें अम्हि गमाविला मोहरा !'

शिकुनी अहह ! देइल यापुढें,
त्या इशारत कोण तरी गडे ?
यापरी नव-तरंग मनांत,
येउनी हृदय होय कंपित
पेयपृष्ठिं उठली इतुक्यांत,
मंद–श्वास–लहरीसह लाट !
फड फड फड पंखा हालवी ती तराया,
तडफड बहु केली, जाहले कष्ट वायां,
मिटवुनि इवलेसे पाय, ती शांत झाली,
अहह, तडक आणी खालतीं खोल गेली !
टाकुनी लांब सुस्कारा, उमाळा दाबुनी उरीं,
चहा तो शांत चित्तानें, प्राशिला वरचेवरी.

---

# पाय घसरला तर—?*

[ कथाप्रसंग–मोठा खास नव्हे ! एक 'भाऊजी' व एक 'वहिनी' यांची ही गोष्ट आहे. बहिष्काराच्या चळवळीच्या लाटेंत चुकारतट्टू 'भाऊजी'नें शाळा सोडून हात धुवून घेतले होते. परंतु, 'वहिनी'च्या 'त्यां'नीं हा घोडा पुन्हा सरकारी शाळेच्या तबेल्यांत ठाणबंद केल्यानें नामोहरम झालेला हा 'हीरो' जुनीं पुस्तकें विकत घ्यावयाला जुन्या बाजारांत निघाला होता. घरची सोबत साधून 'वहिनी' ( उमर वर्षें ११॥ ) 'तिकड'च्या सकाळच्या मोरवळयासाठीं एकदां 'सट' विकत घेण्याकरितां निघाल्या होत्या. दिवंगत कवीच्या कल्पनांचा आडगिऱ्हाइकी सस्ता सौदा करण्याकरितां चोरट्या पावलानें, चोरट्या अंगानें व चोरट्या मनानें कवीही हिंडत असतां त्यानें चोरून खालील संवाद ऐकला. चोरबाजारांतील या चोरट्या प्रकाराबद्दल वाचक क्षमा करोत ! ]

भाऊजी— चल जपून अगदीं वहिनी, ।  
हें बोट घट्ट मम धरुनी। तव करीं, ।  
हा बुधवारांतिल[1] रस्ता, ।  
रविवार त्यांतुनी असतां । आजला ।  
आबाल-वृद्ध नर-नारी, ।  
चाललीं जुन्या बाजारीं । सकल हीं ।

---

*'पाय घसरला तर काय ?' असा प्रश्न अप्रस्तुतच होय; पण 'केशवसुतां'च्या मोठ्या नांवाकडे बोट दाखवून स्वतःला त्यांच्या तोडीस बसवून घेणाऱ्या कांहीं 'कविशार्दूलां'ना 'साध्याही विषयांत मोठा आशय' आढळूं लागल्याकारणानें, ते अशा जातीचे बावळट प्रश्न करूं लागले आहेत. पाय घसरला तर तोंडफोड होऊन बत्तिशी बाहेर पडेल, ठरलेलें लग्न फिसकटेल, एखाद्या दंतवैद्याची पोळी पिकेल आणि रस्त्याशीं कानगोष्ट करीत असतांना अवतेभंवते दांत विचकतील इतकेंच ! पाय घसरला तर आणखी कांहीं होणार नाहीं ! प्रस्तुत कवीला (वाचकहो, क्षमा करा.) खुद्द सदरहू प्रश्नार्थक टायटल अप्रस्तुतच वाटते–पण करणार काय ? मोठ्यांनीं लाथाळलेल्या मार्गावर पाऊल घसरलें तर नवल काय ? १ हें पुण्यांतील पेठेचें नांव आहे.

गे म्हणून। बोट हें धरून। पदर आंवरून।
चाल हळुहळू तूं।
घसरला पाय तर 'छी:थू'। होइल। १

चोरिचीं 'बुकें' विकण्याला,।
बेकार छात्रगण सुटला। या स्थळीं।
हे तसे प्रौढ विद्यार्थी,।
कसलिशी खरेदी करिती। पुस्तकें।

फिरवीत नजर चोंहिकडे।
बघ बडींबडीं हीं धेंडें। चाललीं।
मागुनी। हळुच ढकलुनी। जाइलहि कुणी।
राहि सावध तूं।
घसरला पाय तर 'छी:थू'। होइल। २

'कमिटी'चे[1] नोकर आणी,
रस्त्यावर गेले पाणी। टाकुनी।
जोडाहि घातला त्यांत।
गादिचा मऊ पायांत। नवनवा।
लुगडेंहि टोपपदराचें,।
रेशमी भडक कांठाचें। नेसलें।
हळु चाल। नातरी चिखल। पाठ भरवील।
राहि सावध तूं।
घसरला पाय तर 'छी:थू'। होइल। ३

वहिनी — होणार असे जरि 'छी:थू'।
होउं द्या! धरुं नका किंतू। भाउजी।

---

१ पक्षीं, पुणें म्युनिसिपालिटी.

मी बोलुनि चालुनि अबला ।
चुकुनिया पाय जरि पडला । नवल ना ।
परि शौर्य–मेरु जे अढळ, ।
शक्तीचे दगडी[1] पूल । पुरुष ते ।
निसटून । मुळापासून । पडति गडगडुन ।
तरीहि परंतू ।
कोणिही तयांची ‘छी:थू’ । करितना । ४

जरि असलों दुबळ्या आम्ही ।
परि नाहिं म्हणूं ज्या कामीं । नाहिं तें ।
‘स्वयपाक आज ना’ म्हटलें, ।
तों, कसे कचेरिंत गेले । चुंबित[2] ।
‘नाहीं मी झाडित’ वदलें, ।
तों, केरसुणींसह उठले । झाडण्या ।
परि तुम्ही । बहिष्कारुनी । शिक्षणा, फिरुनी ।
जरी शाळेंत ।
जातां, तरी ‘छी:थू’ करित । ना कुणी । ५

जरि कजाग आम्ही असलों, ।
भांडण्या कामिं कसलेलों, । खंबिर ।
चिमुकऱ्या, चापट्या, चिमटे, ।
घेतले जरी आम्ही ते । आमुचे ।

---

१ हा प्रसिद्ध पूल पुणें शहराच्या उत्तरेला मुळा नदीवर बांधलेला असून कवीच्या गांवाकडे जातांना हमेश लागतो, म्हणून त्याचा या ठिकाणीं खुबीदार उल्लेख केला आहे. २ याचा अर्थ फक्त ‘मुकाट्यानें’ असाच करावा.

परि 'तिकडे' त्याची दाद ।
मागाया जाउं न याद । ही धरा ।
पण तुम्ही । बहिष्कारुनी । न्यायगृहिं फिरुनी ।
उघड जातांना ।
तरी 'छी:थू' करण्या कोणा । धैर्य ना । ६

ते 'पिंगे' 'फेर' धराया, ।
आहोंत न आम्ही का या । तत्पर ।
मर्दासम मर्दचि दिसतां, ।
ते फेर कशाचे धरितां । नाचरे ।
विसरलांत 'मारुनि मरणें' ।
आणिलेंत 'घुसुनी-रुसणें' । बायकी ।
नादान । उघड होऊन । कौन्सिलांतून ।
मिरवण्या बघतां ।
तरि होउनि 'छी:थू' लाथा । मिळति ना । ७

वहिनीच्या ऐकुनि बोला, ।
भरुनिया कंठ गद्गदला ! भाउजी ।
डोळ्यांत आंसवें आलीं, ।
परि रुमाल नव्हता जवळीं । त्याचिया ।
सरकलीं स्मृतीच्या पुढुनी, ।
तीं शाळा कोर्टें आणी । कौन्सिलें ।
भडभडून गळा काढून । ( लाज सोडून )
बोलला बोल ।
" घसरला पाय तर 'छी:थू' । होइल " । ८

त्या गोंगाटांत परंतू।
'घसरला पाय तर छीःथू–' । शब्द हे ।
तडफडुनी वरती उठले ।
बुरुजांतुनि फुटक्या घुमले । क्षणभरी ।
चिवड्याचें गाणें गरम !
क्षणमात्रच पडलें नरम । तेधवां ।
तुम्हि जरी। जुन्या बाजारिं । जाल कधिं तरी ।
तरी ऐकाल ।
" घसरला पाय तर 'छीःथू' । होईल ।" ९

**मिति ज्येष्ठ शुद्ध ५ शके १८४५,**
**टिळक पंचांगाच्या आधारें.**

---

# श्यामले—

[ वृत्तः—तुङ्गभद्रा, मिथुनराशी, मध्यनाडी, राक्षसगणी.]

तूं छोकरी, नहि सुन्दरी। मिष्कील बाल चिचुन्दरी,
काळा कडा मी फत्तरी। तूं काश्मिरांतिल गुल्–दरी !
पाताळिंचा सैतान मी। अल्लाघरींची तूं परी,
तूं मद्रदेशिय श्यामला। मी तों फकीर कलंदरी !
मैदान मी थरपार्करी ! तूं भूमि पिकाळ[1] गुर्जरी,
अरबी समुद्रहि मी जरी। तूं कुद्रती[2] रसनिर्झरी !
आषाढिंचा अन्धार मी। तूं फाल्गुनी मधुशर्वरी,
खग्रास चंद्र मलिन मी। तूं कोर ताशिव[3] सिल्हरी !
बेसूर राठ 'सुनीत'[4] मी। कविता चतुर्दश तूं खरी,
'हैदोस' कर्कश मी जरी। 'अल्लाहु अक्बर' तूं तरी !

---

१. सुपीक. 'अळ' प्रत्ययानें साधिलेलीं नामें युक्तता दर्शवितात; जसें, तप-तपाळ म्हणजे तपोमय; सुत–सुताळ म्हणजे सुती. २. 'नैसर्गिक' अशा अर्थाचा सदरहु गुजराथी शब्द वापरल्याबद्दल धेडगुजरीपणाचा आरोप वाचक न करोत ! ३. सदरहू शब्द गांवठी असला तरी बेचूक आहे; इतका परिणाम-कारक शब्द या ठिकाणीं दुसरा वापरून दाखविल्यास आम्ही–आपला शब्द परत-घेऊं !४. 'मऱ्हाठी' भाषेचें शाब्दिक दैन्य दूर करण्यासाठीं कांहीं धाडशी शब्द-शार्दूलांनीं एक 'हिंदु मिशनरी सोसायटी' काढलेली असून तिच्या मार्फत बाडग्या मऱ्हाठी शब्दांना परत 'कळपां'त तर घेण्यांत येतेंच; एवढें नव्हे तर कुठल्याही परदेशी शिखानष्ट शब्दालाही 'व्रात्यस्तोम'पद्धतीनें विधिपूर्वक 'बाप्तिस्मा' देऊन स्वभाषेंत घेण्यांत येतें. गोऱ्या कातड्याचें हें विलायती पोर देशी आंगड्या-

माजूम मी, तूं याकुती। मी हिङ्ग काबुलि, तूं मिरी,
अन् भाङ्ग तूं, चण्डोल[५] मी। गोडेल मी, तूं मोहरी !
मी तों पिठ्यांतिल वेवडा। व्हिस्कींतली तूं माधुरी,
काडेचिराइत मी कडू। तूं बालिका खडिसाखरी !
पॅटीस तूं, कटलेट मी। ऑम्लेट मी, तूं सागुती.
कांदे-बटाटे-भात मी। मुर्गी बिऱ्यानी[६] तूं परी !
अक्रोड मी कंदाहरी। तूं साहऱ्यांतिल खर्जुरी,
इस्तंबुली अबीर मी। नेपाळची तूं कस्तुरी !
मी घोङ्गडें अन् लक्तरी। मखमूल तूं मउ भर्जरी,
वेडौल वक्र त्रिकोण मी। तूं लम्बवर्तुळ गे परी !
तूं वाढली कितिही जरी। मज वाटसी पण छोकरी,
जरि मूल हें कमरेवरी। तरी तूं मला छकुल्यापरी !
गांभीर्य आणि वयस्कता। जरि ही तुझ्या मुखड्यावरी,
स्मरते मला तव सानुली। मूर्ती मनोहर पर्करी ![७]
लव हांसरी, लव लाजरी। लव कावरी, लव बावरी,
चिनिमातिची जणुं बाहुली। मउ शुभ्र सफेत नि पांढरी !

---

कुंचड्यांत 'सॅल्युअम दगडू' अशा नेटिव ख्रिस्त्याच्या नांवाप्रमाणें किंवा मुक्ति—फौजेंतील भगव्या धोतरपटक्यांतील साहेबाप्रमाणें कसेंसेंच दिसलें तरी वाढत्या परिचयानें त्याविषयीं आपलेपणा वाटूं लागेल अशी खात्री आहे. ५. हा पक्षी-विशेष नसून, मादक पदार्थ आहे. ६. पॅटीस, कटलेट, ऑम्लेट, सागुती, खिमा, बिऱ्यानी हे 'अभक्ष्य' भक्षणविशेष आहेत.—अरेरे, आजकालच्या तरुणांना हेंही सांगावें लागतें ना ! सदर जिन्नस माफक दरानें पुणें—लष्कर येथील 'दोराबजी'-च्या दुकानांत मिळूं शकतात. (ही 'दोराबजी'ची जाहिरात नव्हे !)
७. परकर नेसलेली.

चल सोनुले, छकुले, घरीं । वात्सल्य गे दाटे उरीं,
निर्दोष तो देशील कां । पापा छुपा[८] फिरुनी तरी ?
तूं दोन इंच[९] जरी दुरी । फर्लांग भाससि गे परी,
चल श्यामले, म्हणुनी घरीं । बसुं खेटुनी जवळी तरी !
घे माडगें, घे गाडगें । घे गुलचमन् घे वाडगें,
ताम्बूल घे, । आम्बील[१०] घे, । घे भाकरी, घे खापरी !
किति थाम्बुं मी ? म्हण 'होय' ना । खचली उमेद बरें उरीं,
झिडकारुनी मजला परी । मत्प्रीतिचा न 'खिमा' करी !

---

८. चोरटा. जसें, छुपा कॅमरा, छुपा नगारा इत्यादि ९. सदरहू शब्द इंग्रजी असले तरी दररोजच्या वापरांतले आहेत. व्यवहारांत 'मैल, इंच, फर्लांग' म्हणावयाचे आणि कवितेंत मात्र, अंगुलें, क्रोश, योजनें इत्यादि शब्द वापरावयाचे ! काय हा कृत्रिमपणा ! व्यवहारिक गद्य व काल्पनिक पद्य यांमधील हा सोंवळेपणाचा अंतरपाट काढून त्यांचा एकजीव करणें हाच काव्याचा उद्देश असून वर आम्ही 'नि, अन्, व' इत्यादि शब्द एवढ्याचसाठीं प्रयोजिलेले आहेत. १०. माशांचें कालवण.

# नवरसमंजरी

## शृंगाररस

काव्याचें निज बाड घेउनि दऱ्याखोऱ्यांतला शाहिर,
होता गाउनि दाखवीत कविता कोणा महाराणिला;
कंटाळा तिज ये परंतु कवि तो गुंडाळिना दप्तर,
रागावूनि म्हणून टाकि गजरा ती खालिं वेणींतला !

होता बोलुनिचालुनीच कवि तो त्याला कळावें कसें ?
प्रेमाची करण्यास चाकरि तया संधी बरी ही दिसे !
लज्जाकंपित हातिं देइ गजरा, तो प्रेमवेडा तिला,
ती गालीं हंसली, ( किमर्थ नकळे ! ) शाहीर आनंदला !

# वीररस

होता तो मृगराज जोंवरि वनीं सिंहासनाधिष्ठित,
कोल्हे तोंवरि हे बिळांत दडुनी होते भयें कांपत !
त्याचा देह विराट आज पडतां निष्प्राण भूमीवरी,
आली धांवत टोळधाड जिभल्या चाटीत ही त्यावरी !

तन्नेत्रा उघडूनि कोणि म्हणती, 'या गारगोट्या पहा !'
दाढीचे उपटून केंस वदती, 'संजाब खोटाच हा !'
बोटेंही जबड्यांतुनी फिरविती निःशंक आतां कुणा,
कोणी खेंचुनि शेंपटी फरफरा नेई तया ओढुनी !

कोणी ठेवुनि पाय निर्भयपणें छातीवरी नाचती,
'आतां सोडविण्यास कोण धजतो याला बघूं !' बोलती;
जो तो सिंहच आपणां म्हणवुनी आतां करी गर्जना,
मारी हात मिशांवरी फिरवुनी वीरश्रिच्या वल्गना !

दारोदार बघून वीर असले संतोष होतो जरी,
नाहीं भेंकड मात्र कोणि उरला हें शल्य डाचें उरीं !

# करुणरस

कुठें लिहिल्या कविता न पांच-सात
एकदांच्या छापिल्या मासिकांत;
तोंच बोले, 'शाहीर जाहलों मी,
महाराष्ट्रा हलवीन रोमरोमीं !'
पुढें सरली कंगाल काव्यकंथा,
येरु बोले, 'टीकाच लिहिन आतां !
मस्त झालीं आहेत वडीं धेंडें !
एकएकांचीं फोडतोंच तोंडें !'
हातिं बाळाच्या लागतां कुऱ्हाड
जितें राहिल का एक तरी झाड ?
तसें टीकेचें लागतांच वेड,
मोठमोठ्यांचा काय पुढें पाड ?
'अमुक लेखक करितोच उसनवारी,
तमुक लोळतसे बिछान्यांत भारी !
तमुक ओढतसे रोज बिड्या फार',
असे टीकेचे चालले प्रहार !
चारचौघांची परी करुनि चोरी,
येरु सजवी लेखनाची शिदोरी !
शिव्या द्यायाही शब्द ना स्वतांचे
कसें वर्णूं दारिद्र्य मी तयाचें ?

असो; येरू जाहला सुप्रसिद्ध,
लेखनाची संपली त्यास हद्द !

म्हणे, 'आतां होईन पत्रकार,
देशभक्तीच्या अखाड्यांत वीर !'

येरु घेई बगलेंत जाड ग्रंथ,
आणि सुतक्यासम जाइ मार्गि संथ !

धुवट बगळ्यासम दिसे वरुनि शांत,
कोण जाणे परि अंदरकी बात ?

मोठमोठ्यांच्या बसुनि कच्छपांत,
बने मुत्सद्दी चार आठवड्यांत !

लिहूं लागे गंभीर 'लेखमाला',
'तीन खंडीं' जाहला 'बोलबाला' !

'जाहिराती', 'संस्कार', 'वृत्त', 'पोंचा'—
हातखंडा लिहिण्यांत होय त्याचा !

'स्फुटा'वरतीं जों टाकणार हात—
तोंच मागुनि दुर्दैव हाणि लाथ !

'जहालांचा भुरकाच तिखट-जाळ',
येरु बोले, 'मज नको कधीं काळ !'

'मवाळांचा आळणी दूधभात,
बरा आतां बैसेन ओरपीत !'

येरु संन्यासी होइ ( करुनि क्षौर )
बांधि आश्रम रानांत कुठें दूर !

भोंवतालीं जमवुनी चार शिष्ट,
काळ घालवितो " काव्यविनोदांत "

'मनीं आलें तें होइ सर्व पूर्ण !'
हेंच येरूला एक समाधान.

शांत होई अजुनी न चित्त हाय !
परी धंदा उरला न ! करूं काय ?

देवा, तो विश्वसंसार राहूं द्या राहिला तरी,
परी कारुण्यमूर्तीला द्याच या मोक्ष लौकरी !

---

# हास्यरस

कांहीं शाहिर एकदां उतरले साहित्यरत्नाकरीं,
काढाया तळिंची वरी उपसुनी अज्ञात वाक्संपदा;
आले उत्सुक होउनी रसिकही सारे किनाऱ्यावरी,
ऐशी वाङ्मयपर्वणी उगवते जन्मांतुनी एकदां !

रत्नें आंतुनि फेंकुनी दिलिं कुणीं, कोणीं सुमुक्तावली,
कोणीं रंगित पोंवळीं; कुणि तशा धातू सुरम्याकृती.
दैवें लाभत 'वैजयंति'हि कुणा, कोणा परी शिंपलीं,
टाळ्या-हर्षनिनाद थोर घुमुनी सर्वत्र राहे तटीं !

तों गर्दीतुनि दंड ठोकित पुढें आला कुणी शाहिर,
बोले गर्जुनि, 'पोरखेळ कसले हे बैसलां पाहत ?
माझें थक्कच व्हाल पाहुनि तुम्ही चातुर्य लोकोत्तर !'
ऐसें बोलुनि घेइ सागरिं उडी तो देखतां देखत !

संमर्दीं उठला गभीर ध्वनि तों निःस्तब्ध झालें पुन्हां,
डोळे फाडुनि त्याकडे टकमकां जो तो बघूं लागला;
झाला वेळ बराच; वीर तरिही बाहेर कां येइना ?
येती तर्ककुतर्क ! धीर अगदीं कोणा नसे राहिला !

कोणा आणिल वाटलें फिरुनि हा चौदाहि रत्नें वरी,
किंवा ओढुनि आणणार वरतीं वाग्देवता शारदा !
वाटे सागर कोरडा करिल हा कोणा अगस्तीपरी,
'गेला कायमचा तळीं !' भय असें वाटे कुणा एकदां !

आले बुद्बुद तों, तरंग उठले, डोकेंहि आलें वरी,
झाले लोक अधीर ! प्राण बसले डोळ्यामधें येउनी !
तेजस्वी मुखचंद्रमा मग हळू ये पूर्ण पृष्ठावरी
फांके कांहिंतरी अपूर्व भंवतीं कांती मनोमोहिनी !

आनंदातिशयें पटापट उड्या मारून तो ओरडे,
'या रे या, मज नाचवा रसिक हो, डोक्यावरी घेउनी !
फुंका दुंदुभि, वाजवा चहुंकडे मत्कीर्तिचे चौघडे,
कीं पृथ्वीवर आज ये मजमुळें सत्काव्यसंजीवनी !'

ऐसें बोलुनि हात तो वर करी सर्वांपुढें जों कुठें,
आले तेतिस कोटि देव गगनीं तें पाहण्या अद्भुत.
संपे संशयकाल, मूठ उघडे, भांडार सारें फुटे !
हातीं एक दिसे 'सुनीत' तुटकें !!! झाली मती कुंठित !

हास्याचा उठला तदा खदखदां कल्लोळ विश्वांतुनी,
आकाशीं सुर लागले गडबडां हांसून लोळावया !
मेलेले मुडदेहि ताठ उठले तात्काळ गर्तेतुनी,
दांतांच्या कवळ्या 'सुनीत' वदुनी हांसावया लागल्या !

---

# वत्सलरस

बहुत दिवसांनीं लांबुनी कुठून
येति भेटाया संतकवी दोन
भरुनि आली तों नयनिं प्रेमगंगा,
जशी वर्षाकाळांत चंद्रभागा.

एकमेकां कवळिती बाहुपाशीं,
मिठ्या प्रेमानें घालतीं गळ्याशीं,
हंसुनि पुसती हलकेच कुशल प्रश्ना,
'काव्यप्रसुती जाहली किती कोणा ?'

दंग झाले मग काव्यविनोदांत,
एकमेकां विसरले बोलण्यांत,
श्लेष, कोट्या, रूपकें, अलंकार,
किती झालीं, त्याला न मुळीं पार !

तालसूरावर करुनि हातवारे,
गायनाचे मग सोडिती फवारे.
ऐन ब्रह्मानंदांत टाळि लागे,
जाति विसरुनि देहास पार दोघे !

जवळ सरकत मग हळूहळू येती,
एकमेकां सप्रेम डंवचताती !
घेति चिमटे, चिमकुऱ्या हळुच तैशा,
बालक्रीडा त्या वर्णुं तरी कैशा ?

चापट्याही लागले मारण्याला,
    आणि प्रेमानें तसे चावण्याला.
खालिं पाडुनि एकास मग अखेर,
    वीर त्यावरि जाहला दुजा स्वार !

मिशा ओढुनि, घेऊन गालगुच्चा,
    'बरा सांपडला !' म्हणे 'अरे लुच्चा–'
'नाहीं आतां देणार हलूं सुद्धां,
    लबाडा, का पोटांत मारुं गुद्दा ?

बाळलीला चालल्या त्या अशाच,
    नको वर्णन तें ! करा कल्पनाच,
खरें इतुकें पण, प्रौढता निमाली,
    आणि भरती वात्सल्यरसा आली !

---

# बीभत्सरस

कुणा कविची सुप्रिया रसिक कांता,
हाय, दुर्दैवें कालवशा होतां;
पडे त्यावरि आकाश कोसळून,
म्हणे, 'आतां करुं काय तरि जगून ?'

'आत्महत्या जरि करूं तरी पाप,
दोन बच्चांचा आणि त्यांत बाप !
आजपासुनि करतोंच प्रतिज्ञाही,
लग्नबंधीं पडणार पुन्हां नाहीं !

'तिच्या नांवाची घेउनिया माळ,
क्रमिन आतां मी कसबसा काळ;
तिच्यावांचुनि गाणार दुजें नाहीं,
काव्यस्फूर्ती वाहीन तिच्या पायीं !'

दोन महिने पुरते न यास झाले,
तोंच लग्नाचे दुष्ट दिवस आले.
बँडताशाचा नाद कानीं आला,
भीष्मकविचा थरकांप उडुनि गेला !

तोंच स्वप्नीं येऊन म्हणे कान्ता,
'हाल तुमचे मज बघवती न नाथा !
मुलांची ही होतसे फार दैना,
प्रिया, फिरुनी संसार थाटवाना !'

मृतात्म्याचे आज्ञेस अप्रमाण,
मानणारा चांडाळ असे कोण ?
भीष्मकविनें दुसऱ्याच मुहूर्ताला,
प्रियेसाठीं निजव्रतत्याग केला !

कुणी म्हणती, 'भुललाच कवि सुखाला !'
काय बोलाया होतसे टवाळा !
करी तत्त्वांचा त्याग प्रियेसाठीं,
समाजाची नच त्यास लाज खोटी !

दुजी भार्या स्वर्लोकिं तोंच गेली,
फिरुनि आज्ञा आणखी तीच झाली !
दोन आत्म्यांचा हुकुम पाळण्याला,
जोर दुप्पट भीष्मास अतां आला !

असो; झाली जरि कितिहि वेळ आज्ञा !
भीष्म नाहीं करणार तरि अवज्ञा !
दिसो कोणा 'बीभत्सरस'हि यांत,
प्रेमगंगा परि असे आंत गुप्त !

---

# रौद्ररस

फोटो काढविणें तशांत मग तो छापावया मासिकीं,
कोणाला न रुचे ? नकोच कविची बोलावया गोष्ट कीं !
होता एक प्रसंग मंगल असा संपादकाचे घरीं,
आले शाहिर थोरथोर सगळे आशाळभूतापरी !

फोटोग्राफर त्या नियुक्तसमयीं पाचारि स्थानांवर,
ईर्षेनें सरसावुनी सकल तों धाविन्नले शाहिर !
आतां प्रश्न पडे महा बिकट हा कोठें कुणी बैसणें,
'मी येथें बसणार ! मान पहिला माझाच !' जो तो म्हणे !

'आहें मी तर वाल्मिकी, वसतसे श्रीशारदा मन्मुखीं' !
बोले एक, तया दुजा वदतसे, 'मी व्यास प्रत्यक्ष कीं' !
'हा येथें कवि कालिदास असतां बाता नका या करूं !'
बोले गर्जुनि वीर एक तिसरा वाग्युद्ध झालें सुरू.

पद्याला विसरून येति सगळे शाहीर गद्यावर,
झालें कत्तल गद्य ! येति मग ते वाग्वीर गुद्द्यावर !
कैलासेश्वर रौद्र रूप धरितो विश्वांतकालीं जसें,
वाग्देवीसुत भासले मज तदा रौद्रस्वरूपी तसे !

---

# अद्भुतरस

सरस्वतीचा कवि हा सेवक, । बंदा नोकर आज्ञाधारक.
तिचा आज परि होई मालक । कां नच अद्भुत हें ? १
सरळ येइना रेघ ओढतां, । शुद्ध न येई शब्द बोलतां,
तरि कवयित्री कविची कांता, । कां नच अद्भुत हें ? २
आत्मस्तुतिचें कविस वावडें, । परि काव्याचीं घेउनि बाडें,
हिंडे दारोदार चहुंकडे । कां नच अद्भुत हें ? ३
स्फूर्तिनिर्मिता कविता म्हणती, । रोज होत परि काव्योत्पत्ती,
स्फूर्तींचा बाजार मांडती, । कां नच अद्भुत हें ? ४
शब्दसृष्टिचे हे परमेश्वर, । वाग्देवीसेवेला सादर.
'शब्दा'स्तव परि करिती संगर, । कां नच अद्भुत हें ? ५
शिष्यत्वाला नक्कल म्हणती, । परी भामटे जमवुनि भंवती
स्वतां सिद्धसाधकता करिती, । कां नच अद्भुत हें ? ६
कारकुनीचा छाप कपाळीं, । खर्डे घांसुनि बोटें काळीं,
तरि दास्याची करी टवाळी, । कां नच अद्भुत हें ? ७
स्तुतिपाठक ते रसिक तेवढे, । स्पष्टभाषणी शत्रु बापुडे,
सत्याचे परि गाति पवाडे, । कां नच अद्भुत हें ? ८
पायापुरती यांची सृष्टी । समोर जें जें त्यावर दृष्टी,
विश्वबंधुता तोंडीं नुसती, । कां नच अद्भुत हें ? ९

कुठेंही रसिका, टाकीं भोंवतीं दृष्टि सांप्रत,
दिसेल तुजला तेथें असलें तरि 'अद्भुत'.

---

# शांतरस

जेव्हां होतिल शब्द घेडगुजरी भाषेंतुनी नाहिंसे,
बुद्धीचे 'अरबी' समुद्र सगळे जातील कीं आटुनी!
स्फूर्तीच्या गिरण्याहि बंद सगळ्या होतील काव्यांतुनी
शांतीचे झरतील निर्झर तदा स्वच्छंद पीयूषसे!

जेव्हां होतिल ते पसार सगळे शाहीरकंपू कुठें,
काव्याचीहि खलास होइल यदा पैदास साप्ताहिकी!
जेव्हां बेचव अर्थशून्य सु (शु?) नितें भुंकेल कोणी न कीं,
तेव्हां शांतिरसाभिषिंचित अहा! होतील सारस्वतें!

# कवि आणि कारकून

बोले हांसुनि कारकून कुठला गर्वे कवीला असें
" माझें साम्य तुझ्यामधें दिसतसे—आहोंत बंधू जसे !
दोघेही दिनरात्र ना खरडतो कांहींतरी आपण
जन्माचे पडलेत कीं ठळक हे बोटास काळे वण !

" माझें अक्षर कां कुणास उमगे—आला जरी तो खुदा
ब्रह्मयाच्याहि पित्यास कां समजणें काव्यार्थ तूझा कदा !
येती कागद जे समीप करणें त्यांची मला नक्कल
तूंही ना नकला अशाच करिसी—लागे न ज्या अक्कल !

आणे पै रुपये हिशेब करितों—ज्यांचें न हो दर्शन,
नाहीं पाहियलीं तरी करिसि ना ताराफुलें वर्णन ?
पोटाचें रडगान मी रडतसे वेळीं अवेळीं जसें
चाले संतत काव्यरोदन तुझें तीन्ही त्रिकाळीं तसें !"

" मित्रा, हें सगळें खरें," कवि वदे, " तूझ्याप्रमाणें पण—
माझ्या मूर्खपणास ना दरमहा देई कुणी वेतन !"

---

ग्रंथ ... ४२८८

# चांफा

सुप्रसिद्ध Bee कवींच्या 'चांफा' या हृदयंगम कवितेच्या चालीची व पालुपदाची थोड्याशा बदलानें सदर कवितेंत उसनवारी केली असली तरी या पलीकडे त्या थोर कवितेची कोठल्याही तऱ्हेनें बदनामी करण्याचा प्रस्तुत कवितेंत प्रयत्न केलेला नाहीं हें आधींच सांगून ठेवलेलें बरें; नाहींतर मागाहून कोणी म्हणेल—!

चांफा बोलेना । चांफा चालेना
चांफा खंत करी । कोणी त्यासी पुसेना !

गेला फुलांच्या ग बनीं । सारा शिणगार लेवुनी,
बसला डोकें उंचावुनी । कोणी त्यासी बघेना !
सुकुनी झालीं चोळामोळा । फुलें तीं करी बाजुचीं गोळा,
चुकवुनी इतरांचा मग डोळा । डकवी आपुल्या पानां!
बोले, 'पुष्पांचा मी राजा । आला बहार मजसी ताजा !'
केला ऐसा गाजावाजा । परी कोणी बघेना !

म्हणे, 'मी वृक्ष थोर प्रेमळ । नम्रता रसाळ निर्मळ',
बोलला वाडेकोडें बोल । खरें कुणा वाटेना !
भृंगे पळती आल्यापायीं । पांखरें उडती घाई घाई.
केली खूप जरी चतुराई । कुणी तया भुलेना !

भंवती गुलाब, बटमोगरा । सुगंधी किती फुलांच्या तऱ्हा,
विचारी कोण तिथें धत्तुरा ?। जरिही केला बहाणा !
फांशी अंगीं चंदन-उटी । लावी हळदलेप लल्लाटीं !
आणि काति पीत गोमटी । परी कोणी फसेना !

चोळिलें अत्तर अंगीं जरी । प्राशिली दोन शेर कस्तुरी ।
गंध कां जातिवंत ये तरी ?। असे मुळामध्यें उणा !
लागे जरा उन्हाची झळ । झाला तोंच नूर पातळ,
सरलें सगळें उसनें बळ । पडे खालीं उताणा !!
खदखदां हंसूं लागलीं झाडें । फुलांचीं मिष्किल झालीं तोंडें !
डोळे झांकुनि चांफा रडे । हाय–तें सांगूं कुणां ?

[ चाल नाहीं तरी निदान सूर बदलून ]

चांफा बोलेना । चांफा चालेना
चांफा खंत करी । कोणी त्यासी पुसेना !

---

# अरुण*

[ घोक्याची सूचनाः—बालकवींचा 'अरुण' फार कोमल म्हणून गोविंदाग्रजांनीं 'भयंकर अरुण' लिहिला; पण प्रस्तुतचा 'अरुण' आजपर्यंतच्या सर्व उपलब्ध अरुणांमध्यें 'भयंकर' आहे हें आधीं वाचकांनीं लक्षांत ठेवावें. बारा वर्षांच्या आंतील बालकवींनीं तो वाचण्याच्या भानगडींत पडूं नये.]

अहा, सजवुनी लालतांबडा मुखडा हा कोण
डोकावुनि पाहतो नटासम पडद्याआडून ?
अरुण कशाचा ?—बालरवीचा हा पट्टेवाला
किनखापीचा चढवुनि येई लालभडक डगला ?
टोपी घालुनि लाल पिसांची येत वासुदेव,[1]
मुंडासें बांधून बसे का कुणी नवरदेव ?
स्वर्गांतिल मंडई उघडली किंवा इतुक्यांत
तिथें कापल्या कलिंगडांची भरली ही पेठ ?
लाल गाजरें मांडी कुणि का 'माळिण नव तरणी'
कुणीं फोडिली विलायती वा वांग्यांचीं गोणी ?
स्वर्गंगेच्या रक्तकण्हेरी आज बहरल्या का
फुलला किंवा दाहि दिशांतुनि झेंडूंचा ताफा ?
गगनींच्या आंब्यास लागला का पक्का पाड,
नंदनवनिंच्या निवडुंगाचें का विराट बोंड ?

---

* सदर कविता लिहिण्याची उमेद आम्हांला एका 'उत्साहतीर्थां'पासून मिळाली याबद्दल आम्ही त्यांचे ऋणी आहोंत.

१. भिकारी वासुदेव, लक्ष्मीनाथ श्रीकृष्ण नव्हे.

वखार किंवा कौलांची ही लाल मंगलोरी
पागोळ्यांचें कुणी प्रदर्शन मांडित चंदेरी ?
काव फासुनी दुकान सजवी काय मारवाडी
पोळ्याच्या कीं बैलांची कुणि मिरवणूक काढी ?
कुणा कवीच्या लग्नाची ही आमंत्रणचिठ्ठी,
कॅलेंडर का कुणीं छापिलें नववर्षासाठीं ?
रंगमहालीं रंगसफेती इंद्राच्या चाले
स्वर्भूवर तांबडे तयांतिल ओघळ हे आले ?
नील चांदवा जुन्यापुराण्या गगनाचा फाटे
आलवणाचें आस्तर आलें बाहेरी वाटे ?
थंडीची हुडहुडी न लागो उषासुंदरीला,
पूर्वेच्या शेगडींत म्हणुनी विस्तव पेटविला ?
जाण्याच्या घाईंत घसरुनी बालरवी पडला—
तोंडावरतीं, आणि घोळणा हा त्याचा फुटला ?
टाकी रजनी जातां जातां आकाशीं चूळ,
तिच्या मुखांतिल पडला खालीं चर्वित तांबूल ?
तोंड उघडुनी मुखमार्जन का करिती दाहि दिशा,
जिभा तयांच्या लळलळती या मधुनी लाल अशा ?
दिग्गज करिती उदयमंदिरीं काय साठमारी,
रक्तानें माखली तयांच्या स्वर्भूमी सारी ?
कीं रजनीशीं दंगामस्ती करी अंशुमाली,
तिनें तयाच्या संतापुन ही श्रीमुखांत दिधली ?
धूम्रपान का कैलासावर श्रीशंकर करितां
चिलमींतुनि हा पडे निखारा खालीं जळजळता ?

धुंद जाहले पिउनि शांभवी किंवा दिक्पाल
    निद्राकुल नयनांतिल त्यांच्या रंगच हा लाल ?
फुंक मारुनी काढि मुखांतुनि जळता अंगार
    नजरबंदिचा करी खेळ का कुणि जादूगार ?
सूर्याला उगवत्या गिळाया कीं मारुतराय
    कधींपासुनी जबडा वांसुनि बसले हे काय ?
क्षयी शशीस्तव करावयातें किंवा गुलकंद
    वैद्य अश्विनीकुमार जमविति हे गुलाबगेंद ?
रडरडुनी चालवी बालरवि कीं धांगडधिंगा
    शांत कराया त्यास देत कुणि रबरी लाल फुगा ?
कीं स्वर्गींच्या रंगेलांचें उघडकीस बिंग
    येत काय हें फुटतां काळें रजनीचें भिंग ?
लाल सुरेची लाख बाटली सुरालयीं फुटली
    गतरात्रीं जी, तिची काय हीं अवशिष्टें पडलीं ?
स्वर्गींच्या मजलसींत किंवा 'जास्त जरा झाली !'
    चित्ररथाची म्हणुनी स्वारी लोळत ये खालीं ?
बेहेस्तीं थाटांत साजरा होत बकर-ईद
    स्वर्धेनूंच्या रक्ताचे हे पाट लालबुंद ?
लाख तारका कां सांथीनें मेल्या एकसरी
    सोयीसाठीं कुणी भडाग्नी त्यांचा म्हणुनि करी ?
खून रात्रिचा करुनि पळे हा बंगाली डाकू
    रक्तानें आपाद नाहला कीं बच्चा साकू[1] ?

---

१. कै०–हाय ! आपल्या औट घटकेच्या पराक्रमानें जगाचे डोळे दिपविणाऱ्या या भिस्त्याच्या बच्च्याच्या नांवामागें जगांतील अत्यंत अमंगळ विशेषण लावतांना आमचें हृदय अक्षरशः आणि शतशः विदीर्ण होत आहे ! ( दुःखाच्या भरांत बेहेस्तांतला माल कैलासांत आदा केल्याबद्दल वाचक क्षमा करोत ! )

निषेधार्थ शारदाबिलाच्या किंवा स्वर्देवी
बालरवीचें लग्न उषेशीं पाळण्यांत लावी ?
पृथ्वीवरल्या नको कवींचें 'गायन' ऐकाया
म्हणुनि त्यांस कीं पाठविती सुर हा शेंदुर प्याया ?
क्षणोक्षणीं स्वर्गांत मारिती कवी फेरफटका
धोक्याचा टांगला तयास्तव द्वारीं कंदिल का ?
संन्याशांची वार्षिक परिषद किंवा ही भरली
दाटी झाली गगनीं भगव्या छाट्यांची सगळी ?
स्वर्गांतिल मल्लांची चाले कीं जंगी कुस्ती
आखाड्यांतिल लाल धूळ का उधळे ही वरती
'सुरते'चा[1] संग्राम चालला देवदानवांत
त्यांत कुणावर कुणी 'पुणेरी' भिरकावुनि देत ?
'लाल बावटा संघा' चे कीं जमले वेताळ
करिती भांडुनि परस्परांचीं वदनें बंबाळ ?
'आकाशाच्या बापा'ची कीं मुक्तिफौज[2] सुटली
लालभडक झोंकांत तयांचीं झगमगतीं डगलीं ?
कुणी पुण्याच्या सभेंत खाई मार 'देशभक्त'
पगडीची वावडी तयाच्या चढली गगनांत ?
कन्नडवादें[3] बेळगांवची उडे लाल माती
वातावरणीं तशीच कोंदुनि अजुनि बसे का ती ?

---

१. मागें 'सुरत'च्या कॉंग्रेसमध्यें झालेल्या देशभक्तांच्या 'जोडाजोडींत' 'पुणेरी जोड्या'चा प्रामुख्यानें उपयोग झाला असल्यानें त्याला राष्ट्रीय महत्त्व आलें आहे हें सांगावयास पाहिजे काय ? २. पहा : योहान्न ७ : ३५. ३. कानडी-मराठी-वाद.

'कंपनीं'तला[1] मखमालीचा कुठल्याशा पडदा
इथें पसरुनी काय ठेविला लिलांवास उघडा ?
आजवरी नासती तांबडा रंग प्रेमवेडे
भांडवलावर त्या काढी कुणि दुकान 'घोरपडे' ?
कीं रात्रीं उधळतां रंग जे लक्ष्मीचे लाल
तेच विलसती नभीं घेउनी मूर्त रूप लाल
प्रेमावरचें लिखाण जमवुनि कीं विश्वामधलें
कल्याणास्तव कुणीं जगाच्या येथें पेटविलें ?
अरुण असे का जिवंत हा ? कीं गतप्राण झाला
कुणा कवीनें खून तयाचा निजकवनें केला ?
थकलों आतां ! ! उत्प्रेक्षांची संपत ये कंथा
मान लचकली म्हणतां म्हणतां ही लांबट संथा !
काव्य मरूं दे शब्द झरूं दे—अरुण तडफडूं दे
चहा चालला सकाळचा हा निवुनि पार इकडे !
अहा ! माझिया कपांत असतां अरुणाची लाली
वाहुं कशाला शब्दांची त्या अरुणा लाखोली ?
नको भटकणें अरुणासाठीं उगाच स्वर्गांत
स्वर्ग भेटवी अरुणरसाचा या एकच घोंट !
आणि शारदे, जरी आरुणी पेय न हें मिळतें
तरी मंदिरीं तुझ्या क्षणभरी कोण बरें फिरते ?[2]

---

१. नाटक-मंडळीच्या पडद्यांचा लिलांव झाल्याशिवाय कोणत्याही नाटक-मंडळीच्या आयुष्यावर पडदा पडावयाचा नाहीं हें सुप्रसिद्धच आहे. २ हल्लींच्या 'ज्युबिली'च्या सांथींत या पन्नास कवितांनीं 'अरुणा'ची अनायासेंच ज्युबिली साजरी होत असल्याची कोणा वाचकाची समजूत झाल्यास कवीला फार आनंद होणार आहे.

# सारंगीवाला

[ कलेवरील निरपेक्ष प्रेमानें वाजविलेली सारंगी मनास मोहनी घालते. जीवनाच्या कलहांत तिचा शस्त्रासारखा उपयोग केल्यास कलेसह तिचा नाश होतो. हा अप्रिय अनुभव पुण्याच्या रस्त्यांतून रात्रीच्या वेळीं सारंगीची सुरावट छेडीत जाणाऱ्या एका सारंगीवाल्यानें आम्हांस दिला. कांहीं कवि-मित्रांनीं त्याला उद्देशून रचिलेल्या गौरवपर गाण्यानें आधींच आतुर झालेली रसिकता विरस पावतांच त्याच सुरावर निराशेचें गाणें गाऊं लागावी हें साहजिकच आहे. खालील कडव्यांत सांप्रदायिक कल्पनेच्या कल्पित माधुरीपेक्षां अनुभवाचा कडवटपणा विशेष आढळेल. पण त्याला इलाज नाहीं. त्यांतही एकप्रकारची रुचि आहे.]

थांबीव एकदां सारंगी ही चल जा, येथुन दूर ! ॥ध्रु०॥
काम करुनी देह थकला,
प्राण अगदीं कंठिं आला,
शेजेस पाठ ना कुठें लागली, तोंच निघे तव सूर. १
गुंगला हा जीव आधीं,
गुंतवाया त्यास नादीं,
निवडून वेळ तूं अचुक काढिशी, दिसशी खूप चतूर. २
जीवनाची रागदारी,
ऐकुनीया ये शिसारी,
या विटल्या कानीं संगीताची आतां कुठुन जरूर ? ३
कांपऱ्या या घेशि ताना,
डोलवीशी आणि माना,
दाविशी कराची सहज सफाई, गज चाले चौखूर ! ४

फिरतिं तारांवरुनि बोटें,
नाद वरचे वरति उमटे,
वाहतें हृदय त्यांतून कुठें ? तें बिदागीस आतूर ? ५
आग पेटे आंत पोटीं,
शांतता ही वदनिं खोटी,
हे सूर कशाचे ? जळजळीत हा लोहरसाचा पूर. ६
आंतड्याच्या पिळुनि तारा,
काढशी या गीतधारा,
ऐकून भयानक राग तयाचा हंसे रात्र भेसूर. ७
याचनेचा सूर रडका,
त्यास कसला ताल–ठेका ?
घाबऱ्या मनीं उठवितें उलट हें भळभलतें काहूर. ८
लांकडी हें वाद्य दुबळें,
मानवी त्या हेतु न कळे,
ना तरी तडकुनी दुभंग होइल खास तयाचा ऊर ! ९
हातिं येतां चार तुकडे,
टाकसी कां वाद्य उपडें ?
करितोस कलेची पोटासाठीं विटंबना मगरूर ! १०
जे हरीचे लाल हौसी,
जीव हळवे कीं विलासी,
जा, तया कुशलता दाव ! तयांचे खिसे खोल भरपूर. ११
जीव निद्रेमाजि रंगे,
स्वप्नसृष्टींतून गुंगे,
जा देउं नको क्षणमात्र जगाची तयास जाणिव क्रूर. १२

---

# कवीचीं 'विराम-चिन्हें'

[ मानवी जीवनलेखांतील गोविंदाग्रजांनीं दर्शविलेल्या 'विराम-चिन्हां'-पेक्षां कवीच्या आयुष्यांतील 'विराम-चिन्हें' निराळीं असावींत ही गोष्ट हल्लीं शुद्धलेखनासंबंधीं चालू असलेल्या वादास धरूनच नाहीं काय !]

जेव्हां काव्य लिहावयास जगतीं प्रारंभ मीं मांडिला,
जें जें दृष्टींत ये तयावर "करूं का काव्य ?" वाटे मला,
तारा, चंद्र, फुलें, मुलें किति तरी वस्तू लिहाया पुढें,
तेव्हां 'स्वल्पविराम' मात्र दिसती स्वच्छंद चोहींकडे !

झालें काव्य लिहून—यास कुठल्या धाडूं परी मासिका ?
यातें छापिल कोण ? लावुं वशिला कोठें ? कसा नेमका ?
रद्दीमाजिं पडेल का ? परत वा साभार हें येइल ?
सारें लेखन तेधवां करितसें मी 'प्रश्नचिन्हा'कुल !

अर्धांगी पुढतीं करून कविता नांवें तिच्या धाडिली,
अर्धें काम खलास होइल अशी साक्षी मनीं वाटली !
कैसा हा फसणार डाव ? कविता छापून तेव्हांच ये !
केला 'अर्धविराम' तेथ; गमलें येथून हालूं नये !

झाली मासिकसृष्टि सर्व मजला कालांतरें मोकळी,
केलें मीं मग काव्यगायन सुरू स्वच्छंद ज्या त्या स्थळीं !
माझें 'गायन' ऐकतांच पळती तात्काळ श्रोतेजन !
त्या काळीं मग होतसे सहजची 'उद्गार'वाची मन !

[ पुढील श्लोक 'कोरसा'दाखल असून तो वाचकांनीं कवीला ऐकूं न जाईल अशा हलक्या स्वरांत गुणगुणावयाचा आहे. बाकी ऐकूं गेलें तरी काय व्हावयाचें आहे म्हणा ? ]

डेंग्यू, प्लेग, मलेरिया, ज्वर तसे अन् इन्फ्लुएंझा जरी
हीं एकेक समर्थ आज असती न्याया स्मशानांतरीं—
सर्वांचा परमोच्च संगम चिरं जेथें परी साधला,
देवा, 'पूर्णविराम' त्या कविस या देशी न कां आजला ?*

---

* आमच्या गायनप्रिय रसिक वाचकांसाठीं वरील कवितेचें 'नोटेशन' आम्ही येथें देत आहोंत. त्यामुळें कवितेच्या अर्थाबरोबर तिच्यांतील 'संगति' ही वाचकांना सहज समजून येईल. काव्यगायनेच्छू बालकवींचीही त्यामुळें चांगलीच सोय होणार आहे. मात्र 'स्वरलेखन' करतांना आम्ही 'प्रो० मौलाबक्षांचीं चिन्हें' न वापरतांना आम्हीं आमचीं स्वतःचीं 'चिन्हें' वापरलीं आहेत, हें एक सुचिन्हच नव्हे काय ? स्थलाभावामुळें टंकालयांतील (Foundry) टंचाईमुळें दर श्लोकांतील एकाच चरणाचें नोटेशन देणें शक्य झालें आहे.

, ? ; ! . ॥ध्रु०॥

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| , ऽऽ | , ऽ | , ऽऽऽ | , ऽऽऽ | , ऽऽऽऽऽ | १ |
| ? ऽऽ | ? ऽ | ? ऽऽऽ | ? ऽऽऽ | ? ऽऽऽऽऽ | २ |
| ; ऽऽ | ; ऽ | ; ऽऽऽ | ; ऽऽऽ | ; ऽऽऽऽऽ | ३ |
| ! ऽऽ | ! ऽ | ! ऽऽऽ | ! ऽऽऽ | ! ऽऽऽऽऽ | ४ |
| . ऽऽ | . ऽ | . ऽऽऽ | . ऽऽऽ | . ऽऽऽऽऽ | ५ |

# प्रेमाचा गुलकंद

—बागेंतुनि वा बाजारांतुनि कुठुनि तरी 'त्या'नें
गुलाबपुष्पें आणुनि वाविंत 'तिज'ला नियमानें !
कशास सांगूं प्रेम तयाचें तिजवरतीं होतें ?
तुम्हीच उकला बिंग यांतलें काय असावें तें !
गुलाब कसले ? प्रेमपत्रिका लालगुलाबी त्या !
लाल अक्षरें जणुं लिहिलेल्या पाठपोट नुसत्या !
प्रेमदेवता प्रसन्न होई या नैवेद्यानें !
प्रेमाचे हे मार्ग गुलाबी जाणिति नवतरणे !
कधीं न त्याचा ती अवमानी फुलता नजराणा,
परि न सोडला तिनें आपुला कधिंही मुग्धपणा !
या मौनांतच त्यास वाटे अर्थ असे खोल !
तोहि कशाला प्रगट करी मग मनांतले बोल ?
अशा तऱ्हेनें मास लोटले पुरेपूर सात,
खंड न पडला कधीं तयाच्या नाजुक रतिबांत !
अखेर थकला ! ढळली त्याची प्रेमतपश्चर्या,
रंग दिसेना खुलावयाचा तिची शांत चर्या !
धडा मनाचा करुनि शेवटीं म्हणे तिला, "देवी ! —"
( दुजीं आणखी विशेषणें तो गोंडस तिज लावी )
"बांधित आलों पूजा मी तुज आजवरी रोज !
तरि न उमगशी अजुनि कसें तूं भक्ताचें काज ?

गेंद गुलाबी मुसमुसणारे तुला अर्पिलेले
सांग तरी सुंदरी, फुकट का ते सगळे गेले ?"
तोंच ओरडुनि त्यास म्हणे ती, "आळ वृथा हा" कीं !
"एकही न पाकळी दवडली तुम्हीं दिल्यापैकीं !"
असें बोलुनी त्याच पावलीं आंत जाय रमणी
क्षणांत घेउनि ये बाहेरी कसलीशी बरणी !
म्हणे, "पहा मीं यांत टाकले ते तुमचे गेंद,
आणि बनविला तुमच्यासाठीं इतुका गुलकंद !
कशास डोळे असे फिरवितां कां आली भोंड ?
बोट यांतलें जरा चाखुनी गोड करा तोंड !"
क्षणैक दिसलें तारांगण त्या–परी शांत झाला !
तसाच बरणी आणि घेउनी खांद्यावरि आला ! !
"प्रेमापायीं भरला" बोले, "भुर्दंड न थोडा !
प्रेमलाभ नच ! गुलकंद तरी कशास हा दवडा ?"
याच औषधावरी पुढें तो कसा तरी जगला,
हृदय थांबुनी कधींच ना तरि तो असता 'खपला' !
तोंड आंबलें असेल ज्यांचें प्रेमनिराशेनें
'प्रेमाचा गुलकंद' तयांनीं चाटुनि हा बघणें !

---

# कानगुजला*

तो आला जवळीं नि कानगुजला कांहींतरी हांसुनी,
तों शेजारिल मांजरावर तिनें भिर्कावली फुंकणी !
" जा–हिंडा–सगळ्या सभा समजल्या ! आहे तुम्हांला मुभा !
सांभाळीत घरांत मात्र बसुं का मी कारव्यांच्या सभा ? "
तो आला जवळीं नि कानगुजला कांहींतरी हांसुनी,
तों पोळीवर ओतुनीच उठली रागामधें फोडणी !
" जा आणा दुसरी खुशाल नटवी कोणी ! पहा नाटकें !
येऊं का तुमच्याबरोबर असें नेसून मी फाटकें ? "
तो आला जवळीं नि कानगुजला कांहींतरी हांसुनी,
पोतेरें दिधलें तिनें तडक तों भिंतीवरी फेंकुनी !
" सारे कागद जा चुलींत खुपसा ! दावूं नका वाचुनी !
आंघोळीपुरतें निघेल तुमच्या पाणी तरी तापुनी ! "
तो आला जवळीं नि कानगुजला देऊन कांहींतरी,
तों आलिंगुनि ती म्हणे " करविल्या केव्हां कुड्या या तरी ?"

---

* 'ते आले जवळीं नि कानगुजले'—माधवी ( नाशिक ).

# पत्रें लिहिलीं पण....?

तूं आलीस बघावया सहज 'त्यों' देवालयीं 'गालिचे',[1]
होतों चोरुनि अंग मीहि घुसलों त्या गोड गर्दीमधें !
तूझें दिव्य अहा, न म्यां निरखिलें लावण्य जों गालिचें—
तों डोळ्यांपुढुनी पसार कधिं तूं झालीस विद्युल्लते ?
तूं गेलीस !! मनांत अन् कसकसें वाटूं मला लागलें
यावें अंगिं भरून हींवच जसें पित्तप्रकोपामुळें !
माघारीं फिरलों तसाच धरुनी मी गच्च डोकें तदा,
(कोणी बांधिति कांहिं तर्क !) पडतां वाटेंत मी चारदां !
तेव्हांपासुनि मी तुझी करितसे टेहेळणी सारखी
बागा, पाणवठे फिरून दमलों—देवालयें धुंडिलीं !
उद्देशून तुला कितीक रचिलीं काव्यें तशीं मासिकीं,
'व्यक्ति-स्तंभिं'[2]हि जाहिरात कितिदां पत्रांतुनी म्यां दिली !
पत्रें आजवरी तुला खरडलीं त्यांचीं पहा बंडलें—
येथें बांधुनि ठेविलींत !—पण तीं धाडूं कुठें प्रेमले ?

---

१ म्हणजे रामेश्वराच्या देवळांत, हें दर्दी पुणेकरांना सांगावयास पाहिजे काय ?

२ Personal-Column.

## —स

प्रेमें ज्या कविता दिल्या परत त्वां संपादका, धाडुनी,
देतों ताबडतोब पाठवुनि त्या आतां 'मनोरंजेनीं' !
नाहीं वाटत खेदलेश उलटा आनंद वाटे मनीं,
कीं त्या फाडुनि टोपलींत न दिल्या रद्दींत तूं फेंकुनी !

---

१ कारण त्या तिथें खास छापून येतील. २ हो, नाहींतर काय करतां !

# मनाचे श्लोक

[ रामदासी साहित्यांतून नांवापुरती उसनवारी करतांना रामदासी वृत्तीचाच अंगीकार केला असल्यानें समर्थांचिये सेवकांनीं वक्रदृष्टि करून पहाण्याचें कारण नाहीं. सांप्रदायिक 'मनाच्या श्लोकां'च्या मालिकेंत गोंवून घेण्याचें सामर्थ्य या 'मनाच्या श्लोकां'त नाहीं व तशी आकांक्षाही नाहीं. मात्र हे श्लोक निव्वळ मनाचेच आहेत, असें समजूं नये. हें तो प्रचीतीचें बोलणें आहे !]

मना, नीट पंथें कधींही न जावें,
निशापाणि केल्याप्रमाणें चलावें;
जरी वाहनें मागुनी कैक येती
कधीं ना तरी सोडिजे शान्तवृत्ती ! १

दुकानांवरी लाविल्या लांब पाट्या
मना, थांबुनी वाच रे वाच बा त्या !
अकस्मात् दिसे जाहली जेथ गर्दी
तिथें चौकशी जा करायास आधीं ! २

तिऱ्हाईत कोणी जरी जाय पंथें
तरी रोंखुनी पाहणें त्याकडे तें !
अहा, अंगना त्यांतुनी ती असेल
वळोनी तरी पाहि मागें खुशाल ! ३

कधीं आगगाडींतुनी हिंडतांना,
सिनेमा-तमाशे तसें पाहतांना,
विचारी मना, त्वां न खर्चीत जावें,
सदा श्रेष्ठ धारिष्ट जीवीं धरावें ! ४

कधीं 'मंदिरीं' जासि वाचावयाला
तरी इंग्रजी मासिकीं ठेव डोळा !
कुठें छान चित्रें कुठें 'कूपनें' हीं
दिसे सर्व तें नीट कापून घेई ! ५

कुणाचेविशीं अंतरीं होय तेढ,
निनांवी तया धाडिरे 'नॉटपेड'!
तयाचेनि नांवावरी लठ्ठ व्ही. पी.
मना, मागवी–त्याहुनी रीत सोपी ! ६

सदा खाद्यपेयांवरी हात मारी
बिलें देइ सारून मित्रासमोरी;
" अरेरे, घरीं राहिले आज पैसे—"
खिसे चांचपोनी मना, बोल ऐसें ! ७

कुणाच्या घरीं जा करायास दाढी,
कुणाची फणी घेउनी भांग काढी !
कुणाचा 'स्वयंटाक' टाकी खिशांत,
घड्याळेंहि बांधी तशीं मनगटांत ! ८

कुणाच्या विड्या नित्य ओढीत जाव्या,
तशा आगपेट्याहि लंबे कराव्या !
चहा होतसे केधवां पै कुणाचा
अरे मन्न, घेई सुगावा तयाचा ! ९

इथें पायगाडी तिथें वाद्य पेटी
इथें पुस्तकें वा तिथें हातकाठी;
अशी सारखी भीक मागीत जावें,
स्वतांचें न कांहीं जगीं बाळगावें ! १०

कुणाचें असें मागलें कांहिं देणें
कपर्दीकही त्यांतली त्या न देणें !
कधीं भेटला तो तरी त्या हंसोनी
म्हणावें "असें सर्व तें नीट ध्यानीं !—" ११

कुणाचें कधीं लाधलें पत्र हातीं
कुणाची तशी चिठ्ठि किंवा चपाटी;
तरी त्यांतल्या वाचणें चार ओळी,
न ठावें कळे कोणतें काय वेळीं ! १२

जिथें चालल्या खाजगी कानगोष्टी
उभीं आणि धेंडें जिथें चार मोठीं,
मना, कान दे तोंड वांसून तेथें,
पहा लागतो काय संबंध कोठें ! १३

कडी लागलेली दिसे आंत जेथें,
मना सद्गृहस्था, त्वरें जाय तेथें !
जरी पाहसी आंत ना काक अक्षें,
कशाला तरी त्या फटी अन् गवाक्षें ? १४

नसे ज्याविशीं ठाउकें आपणांतें,
मना, बोलणें 'दाबुनी' त्यावरी तें !
दुजांचीं जरी जाणशी गुप्त बिंगें
तरी धांव घे वृत्तपत्रांत वेगें ! १५

मना सज्जना, चार आण्यांत फक्त
तुला व्हावयाचें असे 'देशभक्त' !
तरी सांगतों शेवटीं युक्ति सोपी,
खिशामाजिं ठेवी सदा गांधि-टोपी ! १६

# कवि आणि कवडा*

[ एक खरी गोष्ट ]

माडीच्या खिडकींमधें कवि कुणी होता सुखें बैसला
'भिक्षांदेहि' करावयास कवडा आला कुणी त्या स्थळा !
" कां हो काव्य नवीन काय लिहितां ? " त्यांतें पुसे खालुनी
सांगे नांव कवी; हंसून कवडा हो चालता तेथुनी !

चार दिवसांनीं मासिकांत येई
काव्य (?) कवड्याचें; नांव तेंच त्याही !
रसिक म्हणती, " वा ! और यांत गोडी ! "
कवी हांसुनि आपुलें काव्य फाडी !

---

* १ कवि=खरा जातिवंत कवि. २ कवडा=भुक्कड शब्दजुळ्या. ( कवि या शब्दाचें क्षुद्र रूप—कुत्सितार्थे डात् इति पाणिनी )

# रसिकांस चेतवणी

झेंडूंचीं रसिका, फुलें जमवुनी देतों तुझ्या हीं करीं,
घे प्रेमें अथवा पदीं तुडव जा ! जें वाटतें तें करी !
रागानें चुरगाळलींस जरि हीं पुष्पें कधीं त्वां बरें—
केव्हांही विसरूं नकोस तळिचें खाण्या परी खोबरें !

संपूर्ण.

# प्रश्नपत्रिका

[ **जरुरी**—प्रकाशित काव्यसंग्रहाच्या प्रत्येक जनकास आपलें सदर अपत्य कोठल्यातरी विश्वविद्यालयीन परीक्षेसाठीं तयारी करणाऱ्या उमेदवारांच्या मान- गुटीवर खास बसणार असा आत्मविश्वास वाटत असतो. 'झेंडूच्या फुलां'च्या कर्त्यांसही तसें न वाटण्याचें कांहींच कारण नाहीं. पैगंबरनिवासी बच्या-इ-साकूच्या राजवटींत सदर 'काव्यग्रंथ' कंदाहार युनिव्हर्सिटींत बी. ए. वा एम्. ए. च्या परीक्षेस नेमला जाण्याचा अत्यंत संभव होता. पण आतां—हाय ! तथापि, या संग्रहांतील कांहीं निवडक कविता मुंबई युनिव्हर्सिटींत पर्शियन या विषयाच्या अभ्यास क्रमांत नेमल्या जाणार असल्याबद्दलची खाजगी कुणकुण आमच्या कानावर आलेली आहे. असें जर खरें असेल तर अभ्यासुक विद्यार्थ्यां- च्या फायद्यासाठीं सदर काव्यसंग्रहांतील कांहीं महत्त्वाच्या प्रकरणावर सूचक प्रश्न देऊन ठेविले तर तें खास अस्थानीं होणार नाहीं ! निदान मागाहून एखाद्या 'टिप्पणिका प्रकाशक मंडळा'नें सदर पुस्तकाचा परीक्षेसाठीं पंचनामा मांडण्या- पेक्षां कर्त्याचें हातूनच त्याचें कांहीं बरेंवाईट झालेलें बरें ! ]

१. [अ] जडजंबालाच्या 'एकच वाक्या'चें सविस्तर पृथक्करण करून त्यांतील निरर्थक विशेषणांची यादी द्या. सदर 'वाक्या'चा व ज्ञानोबारायाच्या 'पसाय- दाना'चा कोठल्याही तऱ्हेनें संबंध लागतो असें दाखवून दिल्यास संपूर्ण प्रश्नाचे गुण बहाल करण्यांत येतील. वेळीं अवेळीं-कारण असो वा नसो—ज्ञानोबांच्या पसायदानांची अशी पाणपोई मांडल्यानें त्या ब्रह्मीभूत महात्म्याची बदनामी होते असें कित्येक रसिकांचें मत आहे याविषयीं तुमचें काय म्हणणें आहे ? [ब] कवि आणि चोर या दोघांमध्यें कोणत्या बाबतींत साम्य असतें अगर असूं शकतें ? काव्य व चौर्य या दोन्ही कलेंत ज्यांचा हातखंडा आहे अशा कांहीं ठळक कवीं- चीं नांवें द्या. ( या प्रश्नाचें उत्तर देण्यास जादा पुरवणी पत्रिका घेण्याची परवानगी आहे.)

२. महाराष्ट्र-शारदेच्या पवित्र मंदिरांत 'कादरखां' नामक पठाण घुस- विल्याचें 'महापातक' केल्याबद्दल त्याच मंदिरास जोडून असलेल्या अन्नछत्रांतील कांहीं पंक्ति-पठाण 'बहोत गरम' झालेले आहेत. त्याचीं कारणें कोणतीं ?

आरंभीं गळ्यांत गळा घालून काव्याचा 'रसगुल्ला' चाखीत बसणारे कांहीं शाहीर चार दिवसांनीं एकमेकांच्या छातीवर बसल्याशिवाय रहात नाहींत असें म्हणतात. तुमचा काय अनुभव आहे ?

४. वाटेवर पडलेल्या कोणकोणत्या गोष्टींची वाटमारी करण्यास कवींना परवानगी आहे ?

५. "सुतक" हें काय प्रकरण आहे ? वाटेल त्या विषयावर दोन मिनिटांत एकादें सुतक बनवून दाखवा. मात्र तें लिहीत असतांना सुतकी चेहेरा करूं नका !

६. मोहरममध्यें कवीनें कोणती मर्दुमकी गाजविली ? 'हुसेन आणि हासन्' कवीला आठवतांच त्याच्या डोळ्यांत 'टच्कन् पाणी' कां आलें ? इब्राहिम् व याकुब यांचीं थोडक्यांत चरित्रें द्या ?

७. प्रियेच्या डोळ्यांतील अश्रू पाहून, कविवल्लभ कळवळतो व ते अश्रू ज्या 'दुष्टानें' तिच्या डोळ्यांतून काढले त्याचा सूड घेण्याची भाषा बोलू लागतो; पण अखेर प्रिया 'विनयानें' त्याला सांगते, " लागोनि नाथ, विडिचा अपुल्याच धूर। आला मदीय नयनीं अजि अश्रुपूर " या कथानकावर 'सखे, बोल-बोल' मथळा देऊन एक कविता रचा. सदर कवितेची आणि या पुस्तकांतील 'सखे, बोल बोल !' ची विस्तृत तुलना करा.

८. रस्त्यावरील विडीचें थोटूक सांपडलें असतां तें बेमालूम टोपींत लपविणारा कवि आणि तेथल्या तेथें शिलगावून 'पिणारा' कवि या दोहोंपैकीं श्रेष्ठ कोण ? तुम्हांला असें थोटूक सांपडलें असतें तर तुम्हीं काय केलें असतें ? त्यावर कविता केली असती कां तें फुंकून खलास केलें असतें ?

९. पुण्यांतील कुठल्याशा 'दुधाच्या गुत्त्यां'तील आटीव दुधाच्या कढईत पाल पडून तिचा भरपूर अर्क त्या दुधांत मिसळल्यामुळें त्याच्या प्राशनानें श्राद्धास बोलावलेल्या ब्राह्मणांची सबंध पंगतच्या पंगत धारातीर्थीं पतन पावून पितरांच्या भेटीला जाते ह्या अत्यंत करुण विषयावर कविता करा. 'ब्राह्मण भडभड ओकून धडधड धरणीवर लोळत आहेत' हा प्रसंग ध्वनिवाचक शब्दांत कौशल्यानें रंगवा.

१०. 'पाय घसरला तर' काय होईल असें तुम्हांस वाटतें ? पुण्यांत उन्हाळ्यांत किंवा पावसाळ्यांत पाय घसरण्याचीं कोणतीं ठिकाणें आहेत ? अशा एका ठिकाणीं पाय घसरल्यामुळें एक कवि मरून पडला आहे अशी कल्पना करून त्या विषयावर एक 'पांडव-दिडकी' किंवा 'कौरव-पावली' वृत्तांत कविता करा.

११. " तुंगभद्रा–मिथुनराशी–मध्यनाडी–राक्षसगणी " वृत्ताचीं लक्षणें द्या. श्यामला 'कितीही जरी वाढली' तरी कवीस 'छोकरी'प्रमाणें वाटतें हें कसें ? कवि स्वतःची माजूम, हिङ्ग, भाङ्ग, बेवडा, कांदे बटाटे-भात इ० पदार्थांशीं तुलना करतो. यावरून कवीच्या धंद्यासंबंधीं तुम्ही कांहीं तर्क बांधू शकाल काय ? 'कलंदरी फकीर', 'थरपार्करी मैदान', 'मुर्गी–बिऱ्यानी', 'पर्करी मूर्ति', 'हुपा पापा', 'माडगें गाडकें' या शब्दावर थोडक्यांत टिपणें लिहा.

१२. 'करुणरसां'तील 'येरू' नवीन धंदा सांपडत नाहीं म्हणून तळमळत आहे. त्याला करतां येतील असे दोन-चार धंदे सुचवा. यावरून " आपल्या देशांत धंदे-शिक्षणाची पायमल्ली चालली आहे " या सार्वत्रिक समजुतीला कितपत पुष्टि मिळते ? " सुनीत या शब्दाची निर्मिति हा अर्वाचीन मराठी वाङ्मयांतील कोलंबसी किंमतीचा शोध आहे ! " असें 'ताजी बातमी' पत्राचे एक विद्वान् लेखक म्हणतात. या विधानाची सांगोपांग चर्चा करा. ( या प्रश्नाचें सर्वोत्कृष्ट उत्तर 'ताजी बातमी'मध्यें छापण्यांत येईल ! ) दोन संतकवि एकमेकांस भेटतांच 'मस्तकावघ्राण' अगर 'कपाळाचें चुंबन' घेतात. कपोलचुंबनापेक्षां कपाळ चुंबनानें अधिक प्रेम व्यक्त होतें असें म्हणतात. खरें आहे का ? अनुभव असेल तरच उत्तर द्यावें.

१३. चार मोरपंखें अंगाला चिटकावून 'मोर' बनूं पहाणारा डोमकावळा व स्वतःच्या बिनरंगी धोतरेवजा फुलांना हळद फासटून सोनचांफा बनूं पहाणारा गांवचांफा यांत तुम्हांस कांहीं साम्य दिसून येतें का ?

१४. 'अरुण' पद्धतीनें 'तुटलेला तारा–' या विषयावर एक उत्प्रेक्षांची गोधडी विणा. 'तुटलेला तारा–' हा विषय असा आहे कीं, त्यावर वाटेल त्याला अकलेचे तारे तोडतां येतील. नमुन्यादाखल एका महाकवींची या विषयावरील एक उत्प्रेक्षा दाखवितों. " शुक्राचार्य स्वर्गांत आपल्या मेजावर दिवा ठेवून वाचावयास बसले आहेत. इतक्यांत कच नाहींसा झाला म्हणून रागानें वेडी झालेली देवयानी तेथें येते व त्या दिव्याला लाथ मारून खालीं पाडते ! तोच दिवा हा का ? " अकलेचा दिवा इतका भडकलेला तुमच्या पहाण्यांत आहे का ?

१५. 'प्रेमाचा गुलकंद' चाखण्याची तुमच्यावर कधीं पाळी आली आहे काय ? राजीखुषीनें व अक्कलहुशारीनें उत्तरें द्या.

१६. 'कानगुजला' या शब्दाची व्युत्पत्ति द्या.

…राच्या देवळांत गालिचे पहावयाला तरुण लोक कां जातात ? …नं कवींला 'कसकसें' वाटूं लागलें म्हणजे काय झालें ? तो वाटेंत पडतांच' कुणी काय तर्क बांधला ?

१८. रस्त्यांतून एकादी नीटनेटकी अंगना जात असेल तर पथिकांचें काय कर्तव्य आहे ? सार्वजनिक वाचनालयांतील नियतकालिकामधील चित्रें व कूपनें कापून आणण्याचा प्रत्येक मेंबराचा जन्मसिद्ध हक्क आहे किंवा नाहीं ? दुसऱ्यांचीं पत्रें चोरून वाचणें किंवा संभाषणें चोरून ऐकणें हें प्रत्येक आर्यपुत्राचें कर्तव्य आहे किंवा कसें ? दारांच्या फटी किंवा झरोके यांचा आपण काय उपयोग करावा ?

१९. 'कवडा' कोणाला म्हणावें ? तुमच्या गांवांतील कवड्यांची यादी करा. अशा कवड्यांच्या काव्यसंग्रहाला 'कवड्यांची माळ' हें नांव दिलें तर तें कितपत उचित होईल ?

२०. (अ) नि, अन्, व, छट्, ह्यः ह्यः इश्श इत्यादि शब्द सढळ हातानें वापरून एकादी कविता करा. (ब) शुद्धलेखन-मंडळानें परसवर्ण वापरण्याच्या विरुद्ध मत दिल्या कारणानें 'ङ्' 'ञ्' इ० हिरमुसलेल्या अनुनासिकांची सदर मंडळास उद्देशून एखादी काव्यमय कैफियत रचा !

REFBK-0004248
REFBK-0004248

?

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्र. ४२४८

रत्नाकर कचेरी, पुणें.

'केशवकुमारां'च्या

विनोदी काव्यांचा पुढील संग्रह

# गाजराची पुंगी

लौकरच प्रसिद्ध होईल.

विजय प्रेस, ५७० शनवार, पुणें.